סליחות

THE

JEWISH PROPITIATORY PRAYER.

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना

THE

JEWISH PROPITIATORY PRAYER:

OR

A PRAYER

FOR THE

FORGIVENESS OF SINS.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

BOMBAY

PRINTED AT GUNPUT KRUSHNAJEE'S PRESS

1859—5619

Price 8 Annas

סליחות

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीने

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापविलें

इ. स. १८५९

इस्राएली ५६१९.

किम्मत ८ आणे

प्रस्तावना.

अलीकडे आपल्या लोकांच्या मनांत प्रार्थनेचा अर्थ समजून घेण्याची फारच उत्कंठता उत्पन्न झाली आहे; हें जाणून मी סליחות ह्मणजे पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना या इब्रीग्रंथाचें भाषांतर केलें आहे. ही प्रार्थना प्रायश्चित्ताच्या दिवसापूर्वी चाळीस दिवस पर्यंत करावी लागती; आणि त्यादिवशीं पापाच्या प्रायश्चित्तासाठीं सर्वांनी आपल्या पापाची क्षमा मागून अगोदरच सिद्ध असावें, हा या प्रार्थनेचा मुख्य उद्देश होय. हा उद्देश लक्षांत ठेवून जे कोणी अंतःकरण पूर्वक ही प्रार्थना करितात त्यांची मात्र ईश्वरापुढें मान्य होईल; कारण यशायाचा भविष्यवाद अध्याय ६६ ओवी २ एथें परमेश्वर असें ह्मणतो कीं, जो दीन व अनुतापी आत्म्याचा असून माझ्या वचनाचें भय धरितो, त्याकडे मी पाहीन.

ही प्रार्थना मूळ भाषेंत रचणाऱ्यानें मोठ्या चातुर्यानें रचिली आहे; ती असी कीं, तो पहिल्यानें प्रार्थना करणारास त्याच्या निद्रेपासून, ह्मणजे त्याच्या दुराचारी मार्गापासून दूर राहावयास, आणि केलेले पापाविषयीं पूर्ण पश्चात्ताप करून ईश्वराच्या भयानें व सदाचरणाच्या मार्गानें वर्तायास सांगतो. आणखी तिजमध्यें ईश्वरास कळवळा आणण्यासारिखा गुण असून तो साध्य करण्याकरितां सर्वांचीं मनें दुसऱ्या गोष्टीकडे न लागतां, तिजकडे मात्र लागावीं, ह्मणून जेव्हां ते संसारसंबंधी कामापासून मोकळे असतात, तेव्हां ह्मणजे मोठ्या पाहाटेस ती करावी असें ठरविलें आहे. जे कोणी या प्रार्थनेस आरंभ झाल्या अगोदर देवालयांत जातात, ते दावीदानें केलेल्या गीतांतून कांहीं गीतें;

ह्मणजे १७, २७, ३२, ५१, ६५, ८५, १०२, १०३, १०४, असीं वाचितात. हीं सर्व गीतें त्या पुस्तकांत आहेत, ह्मणून एथें उतरून घेतलीं नाहींत.

हें भाषांतर इङ्ग्री भाषेच्या व्याकरणाच्या नियमाकडे, आणि शब्दांच्या व वाक्यांच्या खऱ्या अर्थाकडे फारच लक्ष देऊन केलें आहे; आणि तें मराठी भाषेच्याहि रीतीप्रमाणे होण्याकरितां कित्येक शब्द जोडावे व कित्येक सोडावे लागले आहेत. जे शब्द मूळ ग्रंथांत नसतां, यांत जोडले आहेत, ते बहुतकरून कौंसांत लिहिले आहेत. हा ग्रंथ सर्वांस समजावा या हेतूने सोप्या भाषेचा उपयोग करून लिहिला आहे; ह्मणून तो सर्वांस मान्य होईल असी आशा आहे.

सूचना

हें पुस्तक वाचणारांस असी सूचना केली जाते कीं, या ग्रंथांतील ज्या शब्दांच्या अर्थाविषयीं मतभेद पडतो, ते एथे दर्शविले आहेत.

पृष्ठ ओळ

९ १० यथार्थतेने वागणारा. याच्या इब्री शब्दाचा अर्थ कोणी परोपकार करणारा असाहि लावतात.

९ २१ दोषास निर्दोषी ठरविणारच नाहीं. शास्त्रांतील अर्थ पालटूंनये; ह्मणून पूर्ण अर्थ घेतला आहे. जर ונקה याचा खरा अर्थ पाहिला, तर निर्दोष करणे असा होतो; परंतु कोणी त्याचा अर्थ निर्दोषी करणारा असा लावतात.

५९ १८ तेहि (एक वेळ) न्यायांत बसणारे (न्याय करणारे) होते. या वाक्यांतील "न्यायांत" याचा इब्री शब्द מדין असा आहे; परंतु דין हा मूळ शब्द असून त्यापुढे על आणि מ असे दोन अव्यय लागतात; ह्मणून מדין हा मूळ शब्द समजून कोणी त्याचा अर्थ गाद्या असा करितात, आणि कोणी डोल्या असाहि करितात. यांतील शेवटला अर्थ त्या वाक्यास लावला असतां; ते डोल्यांत बसून (मयामीत होऊन प्रवास करणारे) आहेत; असा होतो.

या प्रार्थनेच्या मागें התרת הנדרים ह्मणजे नवस, शपथी, इत्यादिकांपासून मोकळें होण्यासाठीं जी प्रार्थना आहे, तिचेंहि भाषांतर होऊन तयार आहे; परंतु कांहीं विशेष कारणामुळें याबरोबर छापलें गेलें नाहीं.

शुद्धि पत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	२५	सिद्ध हो	सिद्ध हो आणि जग (त्यांतून निभाव;)
४	२३	आमचें तारण	त्याचें तारण
६	८	तूं प्रार्थना ऐकणारा	हे आमच्या राजा, तूं प्रार्थना ऐकणारा
११	१७	यथार्थतेच्या	यथार्थाच्या
१६	१९	अतिक्रय	अतिक्रम.
१६	२३	अपवाद केला	अपवाद केला, व्यभिचार केला.
२९	१७	प्रार्थना ऐकणारा	(आकाश) मंडळावर स्वारी करणारा, प्रार्थना ऐकणारा.
३०	१३	विश्वंभर	सर्व समर्थ
५६	३३	तो तुह्मास	तो दयेने आह्मास

याशिवाय आणखी कांहीं चुका असल्यास, सुज्ञांनी क्षमा करावी.

पापाच्या क्षमेसाठीं

प्रार्थना.

ישן אל תרדם हे निद्रेंत असणाऱ्या, झोंपीं जाऊं नको; तूं आपला आळस सोड, आणि मनुष्य पुत्रांच्या मार्गापासून दूर राहा. तूं आपल्या उंचत्वाच्या मार्गीकडे पाहा, आणि जसे तुला उजेड देणारे तारे (आपला मार्ग क्रमण करायासाठीं) धांव घेतात; तसा तूं अनादि खडकरूप आश्रयाची सेवा करायास धांव.

מה לך נרדם तुला झोंप कां लागली ? ऊठ; आणि आपले देवाला हाक मार.

הקץ לראות त्याच्या आकाशाकडे व त्याच्या अंगुळीच्या कृत्यांकडे पाहावयास जागा हो, आणि त्याची वरील राहोटी (आकाश), जी त्याच्या (सर्व शक्तिमान) भुजेसीं अवलंबून राहिली आहे, तिजकडे, आणि तारे, जे त्याच्या मोहोरी व त्याच्या आंगठीचे शिक्के आहेत, त्यांकडे अवलोकन कर, आणि त्याच्या भयामुळें कांपत राहून त्याच्या तारणाची वाट पाहा; नाहींतर तुझ्या महत्वाचा वेळ आल्यावर तुझें मन गर्विष्ट होईल. מה לך נרדם

וצא בחצות הלילות ज्यांच्या जिभेंत(मुखांत) स्तुति असून, त्यांमध्यें कांहींच कपट व ठकविणें नसतें, अशा

नामांकित मनुष्यांच्या टांचेजवळ (चरणाजवळ) तूं अर्ध रात्रीं जा; रात्रीं ते प्रार्थना करितात व दिवसास ते उपवास करितात; देवाचा मार्ग त्यांच्या ध्यानांत असतो, आणि त्याच्या सिंहासनाजवळ त्यांस स्थान सांपडतें. ईश्वराकडे चढून जाण्यास (स्वर्ग मिळीवण्यास) त्यांचा मार्ग शिडीसारिखा आहे. מה לך נרדם

דמעות תזיל עניך तूं आपल्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूंदे, आणि आपल्या उल्लंघनाविषयीं पश्चात्ताप कर; तुला आपलें वतन मानून घेणारा पुढें काकळूत कर, आणि वाईटपणांत लपून राहूं नको; तूं आपला गर्व अगदीं पाडून (सोडून) चांगलें कर, कारण तें (करणें) सुंदर आहे. तूं आपल्या द्रव्यानें, तारणारे चढून येत तोंपर्यंत देवाचा सन्मान कर, आणि उंच स्वरानें आपल्या देवाला हाक मारायास सिद्ध हो. מה לך נרדם

דלים אשר עפר יסודם ज्यांचें मुळतत्व धूळ. असे जे दरिद्री (मातीपासून घडलेला मनुष्य), त्यांस ज्ञान कोठून असेल? मनुष्य पशूपेक्षां श्रेष्ठ नाहीं, तो आपल्या गौरवाच्या खडकरूप आश्रयास पाहाण्यावरूनच मात्र (श्रेष्ठ आहे); परंतु तें पाहाणे मनाचें आहे, नेत्राचें पाहाणे नव्हे; आणि द्राक्षरसापेक्षां चांगला, असा जो त्यांच्या मूळाचा (जीवनाचा) झरा, तो त्यांस सांपडतो. हे मांस व रक्तमया (मनुष्या), असाच तुला तुझा देव सांपडेल. מה לך נרדם

האהיה אשר אהיה अनंत जो आहे, तोच आहे; त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कृत्यें केलीं आहेत; तोच मारणारा व जीवंत करणारा, कबरेंत उतरविणारा व त्यांतून काढणारा असा आहे. ह्मणून (हे मनुष्या), न्यायांत उभा राहायासाठीं सिद्ध हो; आणि देव कोठें आहे? तो केव्हां न्याय करील? वर काय व खालीं काय आहे? असें ह्मणणारें

तुझें बंड व कुकर्म सोड, आणि निश्चयें, तूं आपला परमेश्वर देव याजवळ परिपूर्ण हो. מה לך נרדם

יהי חסדך हे परमेश्वरा, जसी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आह्मावर होवो. जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. जे लोक असे आहेत, ते धन्य; आणि ज्या लोकांचा देव परमेश्वरच आहे, ते धन्य.

गीत १४५.

תהלה לדוד "दावीदाकडून. हे माझ्या देवा, तूं राजा, मी तुला उंचावीन; आणि सदासर्वकाळ तुझ्या नांवाची स्तुति करीन. सर्व दिवशीं तुझी स्तुति करीन; आणि सदासर्वकाळ तुझ्या नावाचें स्तवन करीन. परमेश्वर थोर, आणि फार स्तुतिमान आहे; त्याचें थोरपण अपार आहे. पिढ्यानपिढी तुझ्या कृत्यांची प्रशंसा करील, आणि तुझ्या पराक्रमाचें निवेदन करील. तुझी स्तुति गौरवी महानपणाची, आणि मी तुझ्या आश्चर्य कृत्यांच्या गोष्टींचे विचार काढीन. लोक तुझ्या भयंकर कृत्यांतला पराक्रम सांगतील आणि मी तुझें थोरपण वर्णीन. ते तुझ्या मोठ्या बरेपणाची आठवण करितील, तुझें नीतिमत्व गाजवितील. परमेश्वर कृपाळू व ममताळू; मंद क्रोध व मोठ्या दयेचा आहे. परमेश्वर सर्वांसीं चांगला; आणि त्याच्या सर्व कृत्यांवर त्याची फार ममता आहे. हे परमेश्वरा, तुझीं सर्व कृत्यें तुला स्तवितात, आणि तुझे भक्त तुझी स्तुति करितात; तुझ्या राज्यांतले गौरव सांगतात, आणि तुझ्या पराक्रमाविषयीं बोलतात; यासाठीं कीं

आपण त्याच्या पराक्रमाचीं कृत्यें व त्याच्या राज्यांतलें वैभवि गौरव आदामाच्या संतानांस कळवावें. तुझें राज्य सर्व युगाचें राज्य; आणि तुझा अधिकार पिढीच्या पिढींतल्या सर्वांवर आहे. जे पडत आहेत, त्या सर्वांस परमेश्वर आधार देतो; आणि सर्व ओणव्यांस तो उभें करितो. सर्वांचे डोळे आशेनें तुजकडे लागतात; आणि तूं त्यांचें भक्ष्य यथाकाळीं त्यांस देतोस. तूं आपल्या मुठी उघडून सर्व जिवांची इच्छा पूर्ण करितोस. परमेश्वर आपल्या सर्व चालींनीं पवित्र; आणि आपल्या सर्व कृत्यांवर उपकारीक आहे. जे सर्व परमेश्वराला हाक मारितात, जे सर्व सत्यतेनें त्याला हाक मारितात, त्या सर्वांस तो जवळ आहे. जे त्याचें भय धरितात, त्याचा मनोरथ तो पूर्ण करितो; आणि त्यांचें ओरडणें ऐकून त्यांस तारितो. जे परमेश्वरावर प्रीति करितात, त्या सर्वांस तो राखितो; परंतु सर्व दुष्टांचा नाश करील. माझें तोंड परमेश्वराची स्तुति उच्चारील; आणि सर्व दैहिक त्याच्या पवित्र नामाची स्तुति सदासर्वकाळ करील. आम्ही परमेश्वराला आतांपासून सर्वकाळपर्यंत धन्य म्हणूं. हालेलुया."

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्यानें (देवानें) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, आणि सर्व इस्राएलांच्या घराण्याच्या आयुष्याच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन, आमचें तारण उगवो आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जी सिद्धि जगांत गाजविली जाते, त्यासर्वांपेक्षां; पवित्र

जो धन्य त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचावलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुह्मीहि तथास्तु ह्मणा.

בן אדם हे मनुष्यपुत्रा, तुला कां झोंप लागली आहे? काकळूत करीत उठून प्रभूच्या प्रभूस हाक मार, आणि आपले हाई ओतून (सांगून) त्यापासून क्षमा शोध (माग). दिवस फिरल्या अगोदर स्नान करून शुद्ध हो; उशीर करूंनको. त्वरा करून आकाशांत वस्ति करणाऱ्याकडे, सहायाकरितां धांवत जा; आणि उल्लंघनापासून व दुष्टाईपासून पळून जा (दूर राहा), आणि शासनाचा धाक असूंदे. (हे देवा), मी विनंती करितों, कीं विश्वासू इस्राएल, तुझें नाव जाणणारे, यांचा तूं अंगिकार कर.

לך אדני הצדקה हे परमेश्वरा, तुला न्यायीपण आहे, परंतु आह्मास तोंड दाखविण्याची लाज आहे.

עמוד כגבר शूराप्रमाणें उभा राहून तूं आपली पापें कबूल करण्याकरितां धैर्य धर; आणि उल्लंघनाचे प्रायश्चित व्हावें, ह्मणून भारी मस्तकाने (धीटपणें) तूं अनंत ईश्वराला शोध, कारण गुप्त कर्में त्यापुढें कधींही लपली जात नाहींत. आणि ज्या सर्व ह्मणी ह्मटल्या जातात, त्या ते (इस्राएल) त्यापुढें ह्मणतात; ह्मणून जो दयाळू, तो जसा बाप आपल्या पुत्रावर, तसी आह्मावर दया करील. לך אדני

לך אדני הצדקה हे परमेश्वरा, तुला न्यायीपण आहे; परंतु आह्मास तोंड दाखविण्याची लाज असतां, आह्मी काय निमित्त देऊं? काय ह्मणूं? काय सांगूं? आणि आपणास यथार्थ कसें मानूं? पश्चात्ताप करणाऱ्यांचा अंगिकार करण्याकरितां तुझा उजवा

हात लांबविलेला आहे; ह्मणून आह्मीं आपले मार्ग शोधून व पारखून तुजकडे फिरतों.

שבים אליך ते आपल्या सर्व मनाने तुजकडे वळतात; ह्मणून दयेनें तूं त्यांचें ओरडणे मान्य कर. तुझ्या पुष्कळ दयेंत आह्मी तुजपुढें गरीब व दरिद्र्यांसारिखें येऊन तुझा दरवाजा ठोकीत आहों; हे दयावंता व कृपावंता, आह्मी तुझा दरवाजा ठोकीत आहों, तुजसमोरून आह्मास रिकामें परतवूं नको. तूं प्रार्थना ऐकणारा आहेस; ह्मणून आह्मास तुजसमोरून रिकामें परतवूं नको. हे प्रार्थना ऐकणाऱ्या, सर्व मांसमय (मनुष्यें) तुजकडे येतील. हे विनंती ऐकणाऱ्या, सर्व प्राणी तुजकडे येतील. तुजकडे सर्व जीव व प्राणीहि येतील. प्राण हा तुझा, व शरीरहि तुझेंच कृत्य आहे; ह्मणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. हे खडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे; ह्मणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. हे परमेश्वरा, प्राण हा तुझा आणि शरीरहि तुझेंच कृत्य आहे; ह्मणून तूं आपल्या नामाकरितां तसें कर. तुझें नांव दयाळू व कृपाळू देव राजा, असें आहे; (हें ऐकून) आह्मी येतों; ह्मणून तुझ्या नामाकरितां तसें कर. हे परमेश्वरा आमच्या देवा, तुझ्या नावांने आह्मी ह्मटलों गेलों आहों. तुझें नाम आह्मामध्यें गाजविलें जातें; ह्मणून हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आह्मास सोडूं नको. हे देवा, आमच्या कर्मामुळें आह्मास लाज वाटती, आणि आमच्या पापामुळें आह्मी फजित होतों. आह्मास (तुजकडे) परतायास तोंड, आणि डोकें उंच करायास कपाळ नाहीं; कारण तुजविरुद्ध आह्मी केलेले अपराध फार वाढले आहेत. आह्मी आपल्या वाडिलांसहित तुजशीं वांकडे वर्तून दुष्टाई केली असतां,

हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं ? काय सांगूं ? आणि आपणास यथार्थ कसें मानूं ? हे उंच स्थानीं राहणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं ? आणि हे आकाशांत वस्ति करणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय कळवूं ? तूं गुप्त व उघड गोष्टी जाणत नाहींस कीं काय ? तूं जगांतील सर्व गुह्य आणि प्राण्याचीं गुप्तकर्में जाणतोस. तूं सर्वांचीं अंतर्यामें पारखितोस; मन व गुर्दकमळें पाहतोस, आणि तुझ्या दृष्टीपासून कांहींच लपलें जात नाहीं. जरीं आमचे अपराध आह्मास दोषी ठरवितात; तरीं हे देवा, तूं आपल्या नामाकरितां आह्मास क्षमा कर. जर आमच्या पातकांकडे तूं लक्ष देशील, तर हे अनंत देवा, तुजपुढें कोण उभा राहूं शकेल ? तुझें भय धरिलें जावें; ह्मणून तुजपाशीं क्षमा आहे; आणि तुझ्याजवळ जीवनाचा उगम आहे; तुझ्या प्रकाशानें आमच्या दृष्टीस प्रकाश असतो. आमच्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आह्मी आपल्या विनंत्या तुजपुढें ओतितों (करितों.)

שמעה ,, हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमा कर; हे प्रभो, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कांकीं तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे.

,, השיבנו ,, हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

(नव्या वर्षाच्या सनानंतर पश्चात्तापाच्या दिवसांत שבט ,, אלהי הצבאות ,, बद्दल יהודה ह्मणावें)

אלהי הצבאות ,, हे करूबांवर वसणाऱ्या परमेश्वरा, सैन्याच्या देवा, तूं आपल्या लोकांस वचन केलें आहेस कीं, अहो मार्गें फिरणाऱ्या लेंकरानों, फिरा; मजकडे मधूर गोष्टी करीत या; मला शोधा;

म्हणजे तुम्ही पुष्कळ दिवस जगाल. तुझीं वचनें सर्वकाळ स्थापित नाहींत कीं काय ? त्यांवरच भरंवसा ठेऊन आम्ही तुजकडे येतों. तूं चांगल्या जीवनांत आमची आठवण कर, तुझ्या फार दयेपैकीं आम्हांवर दया कर. तूं चांगल्यांसीं व वाईटांसींहि चांगला आहेस; व पश्चात्ताप करणाऱ्यांस अंगिकारण्यासाठीं तुझा उजवा हात लांबिवलेला आहे. तूं अपराध्यांच्या मरणाची आवड धरीत नाहींस; म्हणून आम्ही (तुजकडे) सकाळीं व संध्याकाळीं (येतों). हे करूबांच्या सैन्यांत स्तुति पावलेल्या राजा, तूं आम्हांस आमच्या पापांपासून व दोषांपासून शुद्ध कर; आमचीं अपार वाढलेलीं उल्लंघनें तूं क्षमा कर. कोरलेले खडकांकरितां (ज्या पूर्वजांपासून आम्ही कोरले गेलों अथवा उपजलों आहों), त्यांकरितां तूं आम्हांस उत्तर दे; पश्चात्तापाचीं द्वारें बंद होऊं देऊं नको; परंतु आमचें ओरडणें तुजकडे येऊंदे. हे ज्वाला फाडणाऱ्या, तूं आम्हांस आपणाजवळ घे; गुरें व मेंढरें अर्पिल्याप्रमाणें तूं आम्हांस प्रसन्न हो. आम्ही आबाळ वृद्ध तुझ्या पुष्कळ दयेवर भरंवसा व विश्वास धरून तुजकडे फिरतों; म्हणून हे उंचांत वास करणाऱ्या खडकरूप आश्रया आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आम्हांवर दया कर.

שבט יהודה येहुदाचा वंश जुलुमाखालीं व दुःखांत आहे; (आतां) रानांत सिंह (भक्ष्यावांचून) गर्जेल काय ? त्यांतील बाप व लेक, गरीब व दरिद्री तुझ्या तारणाची आशा करितात. आमच्या खंडनाच्यासमयीं, व आम्ही हासण्याचें पात्र होऊं नये म्हणून, आम्हाकरितां तूं उभा राहा; हे परमेश्वरा, तूं दूर कां उभा राहतोस ? हे करूबांवर बसणाऱ्या, तुझें खबुत्र (प्रिय लोक) मरणाच्या दरवाजाजवळ पोहोंचलें आहे, त्यावर प्रकाशीत हो; संकटसमयीं आम्हास सहाय दे (कर). देवाचा हात आखूड आहे काय ? जुन्या झालेल्या प्रवासांत आमचे दिवस नवे कर; (हे देवा), उठ, झोंपी कां जातोस (उगा कां राहतोस) ? जो देश त्यांचा नाहीं, तेथे तुझें पुत्र असतां,

त्यांची आठवण कर; परक्यांस त्यांजवळ येऊं देऊं नको. मोहोर करून गुप्त राखलेला शेवट (निवाडा) एकुलत्यांस कळीव; मग जियोन ऐकून संतोष पावेल, आणि येहुद्यांच्या कन्या हर्ष करितील. हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आमच्या विनंतीला वरील आकाशांत तूं चढूं दे.

אל מלך हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, दयेकरून वर्तणाऱ्या, आपल्या लोकांच्या पापाची क्षमा करणाऱ्या, त्यांतील एक एक पार (दूर) करणाऱ्या, पाप्यास फारच क्षमा आणि उल्लंघन करणाऱ्यांस माफी करणाऱ्या, सर्व मांस मयांबरोबर व प्राण्याबरोबर यथार्थतेने वागणाऱ्या, त्यांच्या वाईटकृत्यांप्रमाणें त्यांची फेड नकरणाऱ्या; हे देवा, तुझे तेरा गुण उच्चारायास त्वां आह्मास शिकविलें आहेस, आणि पूर्वी नम्र (मोशे) यास कळविलेल्या त्या तेरा गुणांच्या कराराची* आज आह्मांकरितां आठवण कर. आणि शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला, आणि त्याने परमेश्वराचें नाव मोठ्याने सांगितलें.

ויעבור "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्यानें असें ह्मटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारोंसीं दया राखितो; अन्याय व उल्लंघने व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; ह्मणून आमच्या अन्यायाची, व आमच्या पापाची क्षमा कर, आणि आह्मास तुझें वतनरूप कर.

ויאמר אני אעביר तेव्हां तो बोलला कीं, मी

*निर्गम. ३४ १०

आपलें सर्व बरेंपण तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्यापुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच. "

רחמנא אדכר לן हे दयावंता, प्रियकर आब्राहामाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

בדיל ויעבור पार जातांना (कळविलेल्या तुझ्या गुणा) करितां

हे दयावंता, बंधन पावलेल्या इसहाकाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर. בדיל ויעבור

हे दयावंता, पूर्ण याकोबाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर

हे दयावंता, यथार्थ योसेफाच्या पुण्याची आह्मासाठीं आठवण कर

हे दयावंता, मोशे भविष्यवाद्याबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

हे दयावंता, आहारोन आचार्याबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

हे दयावंता, आवेशी पिनहासाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

हे दयावंता, अभिषिक्त दावीदाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर. "

हे दयावंता, शलोमो राजाच्या प्रार्थनेची आह्मासाठीं आठवण कर. "

हे दयावंता, तुझा उजवा हात उभारून आपलें तारण उगीव. "

हे दयावंता, लज्जित तोंडाने आह्मी तुला हाक मारायास आलों आहों; ह्मणून आह्मावर दया कर. בדיל ויעבור

हे दयावंता, तुझें सामर्थ्य आह्मांमध्यें प्रगट कर. ”

हे दयावंता, आमचे न्यायत्व प्रकाशांत आण. ”

हे दयावंता, तुझें गौरव आह्मावर ठेव. ”

हे दयावंता, आमच्या दुष्ट कृत्याप्रमाणे आमची फेड करूंनको. ”

हे दयावंता, तुझें वैभव आह्मावर ओत. ”

हे दयावंता, आह्माकरितां यथार्थता योज ”

हे दयावंता, आह्मावर चांगलें मोज. ”

हे दयावंता, आह्मावर पुष्कळ चांगलें येऊं दे. ”

हे दयावंता, तुझी दया आह्मावर लोट. ”

(पश्चात्तापाच्या दाहा दिवसांत खालीं लिहिलेलीं पांच वाक्यें बोलावीं.)

हे दयावंता, आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही. ”

हे दयावंता, आह्मास दयेच्या पुस्तकांत लिही. ”

हे दयावंता, आह्मास यथार्थतेच्या पुस्तकांत लिही. ”

हे दयावंता, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. ”

हे दयावंता, आह्मास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. ”

हे दयावंता, आह्मावरून तूं आपला राग व क्रोध जिंक (काढ.) ”

हे दयावंता, तूं आमचा शेवट (नाश) करूंनको. ”

हे दयावंता आमचीं ऋणें व आमचे अपराध आह्मास सोड व क्षमा कर. ”

हे दयावंता, तुझ्या चांगुलपणाचा उजेड आह्मावर प्रकाशित कर. בדיל ויעבור

हे दयावंता, (तूं) आह्माकरितां आश्रय व साहायकारी हो. "

हे दयावंता, आमचें चांगलें होण्याची खूण कर. "

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड. "

हे दयावंता, प्रसन्नतेने आमची प्रार्थना कबूल कर. "

हे दयावंता जाचणुकीच्या वेळीं आमच्या प्रार्थना व आमचे अर्ज कबूल कर. "

हे दयावंता, (आमच्या) जीवावर दया कर. "

हे दयावंता, चांगलें वर्ष आह्मांवर येऊंदे. "

हे दयावंता, तूं आपल्या क्रोधापासून फीर. "

हे दयावंता, तुजपुढून आह्मास रिकामे परतवूं नको. "

אנא כעב זדוני (हे देवा,) मी विनंती करितों कीं, माझे अधर्म तूं ढगाप्रमाणे पुसून टाक; आणि माझे अपराध क्षमा कर; कां तर ते पुष्कळ आहेत.

וסלחת לעוני आणि माझे अपराध क्षमा कर; कां तर ते पुष्कळ आहेत.

אך ימחה परंतु माझ्या बापासमोर लिहिलेलें कसें पुसून टाकलें जाईल ? कारण जें लिहिलें आहे, तें माझ्या वाडाच्या दिवशीं पुसून टाकायास माझ्या विचाराप्रमाणे त्याच्या मनांतील विचार नाहींत; तें लिहिणे देवाचें लिहिणे आहे. וסלחת

נא אם תחקור हे खडकरूप आश्रया, आतां जर तूं माझ्या तारुण्याचा शोध व चौकशी करितोस, (तर

पाहा) रात्रदिवस मी दुष्टाईची योजना केली; आणि जर माझ्या पापाचा व अतिक्रमाचा तपास करितोस, तर मी पायांच्या तळव्यापासून डोक्यापर्यंत दोषी आहें. וסלחת

יהרסון ויבנון ज्या दिवशीं माझीं पातकें मजसमोर साक्ष देतात, तेव्हां माझे विचार कधीं मोडले जातात, आणि कधीं आशेने बांधले जातात. परंतु देव पाप क्षमा करणारा, कृपाळू व दयाळू आहे; ह्मणून निश्चयें माझे विचार बांधले जातील (स्थिर होतील). וסלחת

מה לידידי जें काहीं माझ्या प्रियाचें व राज्याचें गुह्य आहे, त्यासाठीं मी प्रार्थना करितों; परंतु ती मान्य केली जात नाहीं; आणि माझ्या अंधक (खोल) स्वभाविषयीं विचारितों; तर कोणीच मला त्याचा अर्थ सांगत नाहीं. मग मी ह्मणतों कीं, मी (तें समजूं) शकणार नाहीं; कारण त्यावर (देवाची) मोहोर आहे. וסלחת

שובה שיבת पाडाव करून नेलेले व मिसळलेले लोकांच्या शेषास तूं परतीव, आणि कराराप्रमाणे तुझ्या क्रोधाचा शेवट कळविण्याकरितां सुवार्ता घोषक पाठवून, जरी ते लोक बुद्धिमान नसले; तरीं तूं त्यांचें सांत्वन कर. וסלחת

הוסף יד (तूं आपला) हात आह्मावर पुनः लांबवून दुसऱ्यावेळीं आपला दूत (भविष्यवादी) पाठीव; आणि दडपलेलें व दुःखांत पडलेलें शिंग उगीव; ह्मणजे तो प्रबळ होऊन, जें कांहीं करील, तें सफळ होईल. तेव्हां ते जाणतील, कीं तो देवाचा अभिषिक्त आहे. וסלחת

" ויעבור " "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्याने असें ह्मटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारो-

सीं दया राखितो; अन्याय, उल्लंघनें व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; ह्मणून तूं आमचे अन्यायांची व आमच्या पापांची क्षमाकर, आणि आह्मास तुझें वतनरूप कर."

אנשי אמונה प्रमाणिक मनुष्यें नाहींसीं झालीं आहेत, तीं (आपल्या सत्कर्मांच्या) सामर्थ्यानें (तुजपुढें) येत-असत; खंडन सोसायास तीं शक्तिमान होतीं आणि तीं दुःखाचें निवारणहि करीत असत. क्रोधाच्यासमयीं तीं आह्मास भिंतीसारिखीं व आश्रयासारिखीं होतीं; तीं आपल्या गुह्य प्रार्थनेकडून राग शमवीत असत. हे देवा, त्यांनी तुला हाक मारिल्या अगोदर, त्वां त्यांस उत्तर दिल्हेंस. तीं तुला विनवायास व तुझी प्रसन्नता मिळवायास जाणत असत; ह्मणून तूं त्यांवर बापाप्रमाणे प्रीति करुन, त्यांच्या तोंडांस (त्यांस) रिकामे परतविलें नाहींस. परंतु आमच्या पुष्कळ अपराधामुळें तीं नाहींसीं झालीं; आणि आमच्या पापामुळें तीं आपल्या पूर्वजांसी मिळालीं आहेत. आपण विसांव्याप्रत जाऊन, त्यांनी आह्मास धावादेण्यास मार्गें टाकलें आहे. कुपण नीट करणारे मोडकळीस गेले; राग फिरविणारे शांत (मृत) झाले. आतां खंडनांत उभे राहणारे (संकट दूर करणारे) कोणी नाहींत; तुझ्या प्रसन्नतेची वाट पाहणारे नाहींसे झाले. आह्मी पृथ्वीच्या चोहोंकोनीं भटकत फिरत आहों; परंतु कोठेंच आह्मास अरोग्यता सांपडत नाहीं. आतां लज्जित तोंडानें क्षमा साधनाच्या वेळीं, हे देवा; आह्मी तुला शोधायास आलों आहों.

אל מלך पृ. ९

תמחנו מרעות आह्मी वाईटामुळें अपधाकतों, संकटामुळें आमचें बळ खचतें; आह्मी फारच नीच होऊन धुळीस

मिळालों आहों. हे दयावंता, आमचा स्वभावहि तसाच आहे; आह्मी ताठर मानेचे व बंडखोर आहों. जरी आह्मी आपल्या तोंडाने ओरडून तुला हाक मारितों; तरी आह्मी पाप करितों व आमचे मन वाकडें व विपरित आहे. यद्यपि हे परात्परा! तुझी दया सर्वकाळापासून आहे, आणि क्षमा ती तुझ्या जवळच आहे. तूं वाईटाविषयीं अनुतापत असतोस, आणि दयेकडे वळतोस; ह्मणून अशा वेळीं लपून राहूं नको, कारण आह्मी मोठ्या विपत्तींत पडलों आहों. आह्मावरील तुझें चांगुलपण व दया सर्वांच्या दृष्टीस समजीव (पाड); आह्माविषयीं चाहाडी करूं नये, ह्मणून सातानाचें तोंड बंदकर; त्यास धमकाव ह्मणजे तो उगा राहील. आणि आह्मास यथार्थ ठरविण्याकरितां चांगला मध्यस्थ उभा कर; ह्मणजे तो आमचा सरळपणा कळवील. हे दयावंता व कृपावंता, जेव्हां तुझा घरचा विश्वासू (मोशे) याने तुजपुढें येऊन विनंती केली; तेव्हां तूं आपला मार्ग त्यास कळविलास व आपली सत्यता त्यास समजविलीस.

אל מלך पृष्ठ ९

אָנָא אל תעש हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं आमचा विध्वंस नकरितां, न्यायांत आपला हात आटोपून धर. आह्मी तुझ्या समक्ष निषेध पावायास आलों असतां, तूं आमचीं नावें तुझ्या पुस्तकांतून पुसून टाकूं नको. जेव्हां तूं शिक्षण शोधायास (करायास) लागतोस; तेव्हां (आह्माकडे) रागापूर्वी तुझी दया येऊंदे. चांगल्या कृत्यांविषयीं तुझ्या दृष्टींत आमचीं न्यूनता दिसून आली असतां, तुझी उपकारबुद्धि आह्माजवळ आण. हे आमच्या बापा, आह्मी ओरडत व विनंती करीत आहों, तुझी प्रार्थना करितांना आमचें तारण व्हावयास आज्ञा कर. सरळाच्या राहाट्यांस

दासत्वांतून परतीव; कारण पाहा, त्याच्या (नगराचीं) द्वारें ओसाड पडलीं आहेत. तुझ्या वाक्याची आठवण राखून, त्याच्या संततीच्या मुखांतून प्रमाण नेमाचा विसर पडूं देऊंनको. त्या मोहोर केलेले प्रमाण नेम उघड, आणि तुझें गुह्य तुझ्या शिष्यांमध्यें; ह्मणजे पृथ्वीच्या मध्यभागीं अर्धचंद्राच्या आकृतिसारिखी वाटोळी बसणाऱ्या मोठ्या न्यायसभेच्या सभासदांमध्यें व त्या मोठ्या सभेचा एक तृतीयांस, ज्या लहान सभेंत असे, तिच्या सभासदामध्यें स्थापित कर. हे अनंता! जे तुला ओळखितात, त्यांस तूं स्वीकार; परंतु जें राष्ट्र तुला जाणत नाहीं, त्यास नाकार; आणि आशेने बाधलेल्या (आशालागलेल्या) बंदिवानास दुर्गाकडे फिरीव.

" אנא " हे परमेश्वरा, आमचा देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आह्मी मागतों; आणि आमच्या विनंतिपासून तूं लपून राहूं नको; कारण आह्मी यथार्थ आहों, आह्मी पाप केलें नाहीं, असें तुजपुढें बोलायास, हे आमच्या देवा व आमच्यापूर्वजांच्या देवा, आह्मास धिटाई व धारिष्ट नाहीं. निश्चये आह्मी व आमच्या वडिलानींहि पाप केलें आहे.

"אשמנו בגדנו" आह्मी अतिक्रम केले, विश्वास घात केला, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणेहि केलीं. अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलूम केला, खोटें रचिलें, व वाईट योजनाहि केल्या. भोंदलें, थट्टा केली, बंडावा केला, अपवाद केला, आह्मी व्यर्थ व खोट्या शपथीहि वाहिल्या. अनिवार झालों, वांकडे वर्तलों, उल्लंघने केलीं, दु:ख दिल्हें, आह्मी आपली मान ताठरहि केली. दुराचार केलें, नासलें, ओंगळ केलें, बहकलों आणि दुसऱ्यासहि बहकविलें. आणि

आह्मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों; परंतु तेणेंकरून आह्मास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जे अवघें आह्मांवर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहेस, परंतु आह्मी दुष्टाई केली आहे.

אשמנו מכל עם आह्मी सर्व लोकांपेक्षा अधिक अतिक्रम केले आहेत; सर्व राष्ट्रांपेक्षां आह्मास अधिक लज्जा प्राप्त झाली आहे. आमचा हर्ष मावळला आहे; आमच्या पापामुळें आमचें न्हदय मूर्छित झालें आहे. आमची आशा व्यर्थ गेली; आमचे अलंकार आह्मावरुन हिरावून नेले आहेत. आमच्या पापामुळें आमच्या पवित्र मंदिराचा नाश होऊन नगर ओसाड पडलें आहे; आमचा सुंदर देश परक्यांस, आणि आमची संपत्ती इतरांस (दिल्ही गेली आहे.) असें असतां अद्याप आह्मी आपल्या परिचारापासून परत येत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल ? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजांनींहि पाप केलें आहे.

רבונו של עולם हे जगदीशा, उत्तररात्रीं मी आपलीं लाहान व मोठीं उल्लंघनें कबूल करितों. मी आपल्या कुकल्पनेंकडून व दुष्ट कृत्यांकडून तुला चिडविलें; (ह्मणून मी भयानें ह्मणतों,) पाहारेकऱ्या रात्रीचें काय ? पाहारेकऱ्या रात्रीचें काय? माझ्या मनानें व नेत्रांनीं पाप करण्याविषयीं मसलत केली, आणि रात्रंदिवस त्यांस विसावा नव्हता; आणि माझ्या उरलेल्या अवयवांनीं तुझ्या दृष्टीपुढें वाईट करण्याकरितां आपणामध्यें फुसफुस केली, अवघा दिवस व अवघी रात्र ते उगेच राहात

नाहींत. आणि ज्यां करायाच्या व नकरायाच्या आज्ञा मोडल्या, ह्मणून सर्व रात्रीं आपलें आंथरूण पाणीगत करितों; आपल्या अश्रूंनीं आपल्या पलंगास भिजवितों. ज्याचीं कृत्यें भयंकर (देव) तो कदाचित् माझ्या शोकाची वाणी ऐकेल; ह्मणून रात्रंदिवस मी ओरडत आहें. मी आपल्या उल्लंघनामुळें व आज्ञा भंग करण्यामुळें आपली वाणी उचलून ओरडतों; रात्रीं मला विश्रांती नाहीं. जो भविष्य जाणणारा (सर्वज्ञ,) त्यापुढें आपल्या पापाचा कांहींसा भाग आठवून, मी स्तुति करायास उठून येतों; आणि आजच्या रात्रीं मी देवासमोर आपलीं उल्लंघनें आणि अधर्म कबूल करितों.

אשמנו באמר आह्मी शब्देंकरून व कृत्यांकडून दोषी आहों; दुष्कर्मे करण्याकरितां आह्मी तुझ्या नियमाचा धिःकार केला; न्याय व यथार्थतेचा आह्मी तिरस्कार केला; आणि आमचा मार्ग कांटेरी कुपणासारिखा झाला आहे. आह्मी करार मोडून, उल्लंघनें अपार वाढविलीं आहेत; तूं शिकविलेलें चांगलें आह्मी टाकून दिल्हें; आणि तूं धिःकारलेल्या वाईटासाठीं आह्मी श्रम केले. आह्मी खोटें व कपट रचिलें; आणि पापाची व दोषाची योजना केली; जगत्संबंधी व्यर्थतेमध्यें आह्मी आपलीं (आयुष्याचीं) वर्षें संपविलीं; तूं सर्व गुप्त गोष्टीविषयीं आमचा न्याय करशील याची आठवण राखिलीच नाहीं. आह्मी ज्ञानाचा बोध धिःकारला; बुद्धि आणि ज्ञानाविषयीं आह्मी मूढ झालों आहों. तुझ्या यथार्थ न्यायाविषयीं आह्मीं असंतुष्ट झालों; आणि तुझ्या नियमाचा मार्ग आह्मी सोडिला. आमचे तोंड (लक्ष) आमच्या आवडी पूरविण्याकडे लागलें आहे; आह्मी आमच्या वांछाच्या खाणींत बुडालों; ज्ञान्याच्या तोंडच्या निषेधामुळें आह्मास राग आला; दुष्टाईच्या

भाषणें करून सफळ व्हावें, ह्मणून आह्मी आपलें तोंड उघडलें. तुजपासून निरंतरचें फिरणें आह्मी फिरलों आहों; निषेधणाऱ्या मनुष्यास आह्मी ओंगळ मानिलें आहे. तथापि जें अवघें आह्मावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहे, परंतु आह्मी दुष्टाई केली.

לעינו עשקו आमच्या दुष्कर्मांमुळें आमचे डोळे पीडित झाले आहेत; व आह्मी विखरलेले व लुचाडलेले आहों. शत्रूनें आह्मावर आपलें जोकड ठेविलें आहे; तें आह्मी आपल्या खांद्यावर वाहात आहों; दासांनी आह्मावर प्रभुत्व केलें; आह्मांस त्यांच्या हातांतून सोडवायास कोणी नाहीं. पुष्कळ संकटांनी आह्मास घेरिलें आहे; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी तुला हांक मारितों, परंतु पाहा, आमच्या पापामुळें तूं आह्मांपासून दूर झाला आहेस. आह्मी तुझ्या मागून वळलों, आणि शेरडांप्रमाणें बहकून नाश पावलों; असें असतां, अद्यापि आह्मी आपल्या परिचारापासून मागें वळत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल ? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजांनीहि पाप केलें आहे

אשמנו בגדנו पृ १६

ליי אלהינו הרחמים प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी पाप केलें; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी बंडावा केला; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. (हे आमच्या प्रभो !) जें पाप आह्मी मूर्खपणानें व पापिष्टपणानें केलें, तें आह्मावर लावूं नको.

חטאנו צורנו हे आमच्या खडकरूप आश्रया, आह्मी पाप केलें आहे; हे आमच्या निर्मानकर्त्या, आह्मास क्षमा कर.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दोन वेळा बोलावें)

אראלי מעלה वरील आरआलीम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि निवडलेली संपत्ति (इस्राएल) उत्तरेंकरून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव. आहे. יי הוא האלהים

גלגלי מעלה वरील गलगालीम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि प्रख्यात संपत्ति (इस्राएल) उत्तरेंकरून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. יי הוא האלהים

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें आणि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो.वे.)

בטרם שחקים आकाश व पृथ्वी विस्तारल्यापूर्वीपासून परमेश्वर राज्य करीत आहे; ज्योति प्रकाशल्यापूर्वी परमेश्वरानें राज्य केलें; आणि पृथ्वी वस्त्राप्रमाणें जीर्ण झाल्यावर व आकाश धुराप्रमाणें विरघळून गेल्यावरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. יי מלך

ועד לא עשה पृथ्वी व शेतें उत्पन्न केलीं नव्हतीं तेव्हांपासून परमेश्वर राज्य करीत आहे; पृथ्वीवरील घडिवलेले पदार्थ सिद्ध केल्या अगोदर परमेश्वरानें राज्य केलें; आणि परागंदा झालेले, चोहोंकडून एकत्र होण्याच्या वेळानंतर हि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. יי מלך

מיוחד באהיה जो आहे तोच खुद्द आहे; तोच होता, तोच आहे व तोच असेल; तोच मारणारा व जि-

वंत करणारा; कोणीं निर्माण झालेला देव त्याच्यापूर्वीं नव्हता, व त्याच्यानंतरहि कोणीं व्हायाचा नाहीं.

אחד אלהנו आमचा देव एकच, आमचा प्रभु मोठा, त्याचें नाव पवित्र व भयंकर आहे. तर तुझी दया आकाशा एवढी, आणि तुझी सत्यता आभाळा एवढी मोठी आहे. तूं मोठा आणि आश्चर्याचीं कृत्यें करणारा आहेस. तूंच केवळ देव आहेस. ज्या राष्ट्रांनीं तुला जाणिलें नाहीं, त्यांवर; आणि ज्या राजांनी तुझें नाम घेतलें नाहीं, त्यांवर; तूं आपला संताप ओत.

לקדושת שמך आह्मास नको; परंतु तुझ्या पवित्र नामास गौरव दे. हे परमेश्वरा, आह्मास नको; परंतु तूं आपल्या दयेवरून व आपल्या सत्यतेवरुन आपल्या नामास गौरव दे. राष्ट्रांनीं कां ह्मणावें ? कीं, त्यांचा देव आतां कोठें आहे ! तर आमचा देव आकाशांत; एकच जो देव, तो आकाशांत आहे. प्रत्येक दिवशीं दोन वेळा आह्मी (त्याचें एकत्व) मानितों. तो जिवंत व निश्चल आहे; तो दयेने व यथार्थतेनें व्यापलेला आहे. त्याला जें आवडलें, तें सर्व त्यानें आकाशांत व पृथ्वींत केलें आहे. तूं काय करितोस ? असें त्यास ह्मणणारा कोणीं नाहीं; आणि तूं काय चालविलें आहेस ? असें त्यास ह्मणणारा कोणीं नाहीं; कारण सर्व त्याच्या हाताचीं कामें आहेत.

אלהנו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणीं ऐक, आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर.

אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, या आमच्या दीर्घ दासत्वांत तूं आमचा नाश करूं नको. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जे आमच्या वाईटावर उठतात, त्या सर्वांचा नाश कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या कराराची आठवण कर, आह्मास विसरूं नको. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुभवर्तमान ऐकीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, सर्व कठोर व वाईट शासनें आह्मावरून रद्द कर (उडीव). "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या राज्याचें वैभव आह्मामध्यें लवकर प्रगट कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगला निवाडा कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी तुझा शोध करीत असतां, आह्मास सांपड. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मावर उठणाऱ्यांपासून आमच्या रक्ताची झडती घे. "

हे आमच्या अकाशांतील देवा, आज व नेहमी तूं आमची प्रार्थना ऐक. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास तुजकडे पूर्ण पश्चात्तापाने परतीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या आशेविषयीं आह्मास लाजवूं नको. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी हाक मारितों. आणि तूं आह्मास उत्तर दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची आणि आमच्या मुलालेंकरांची करुणा तुला येऊं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या पापापासून आह्मास शुद्ध कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विटाळापासून आह्मास शुद्ध कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. "

पश्चात्तापाच्या दाहा दिवसांत खालीं लिहिलेलीं पांच वाक्यें ह्मणावीं.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहीं. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास यथार्थ व धार्मिक लोकांच्या पुस्तकांत लिहीं. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिहीं. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुद्धतेच्या पुस्तकांत लिहीं. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिहीं. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास जिंकणाऱ्यांस तूं जिंक. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा तूं विध्वंस करूं नको. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जर आह्माकरितां नाहीं; तर तूं आपल्या नामाकरितां आमचें कार्य कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मावर जुलूम करणाऱ्यांवर तूं जुलूम कर "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माबरोबर लढणाऱ्यांशीं तूं लढ. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचे मनोरथ चांगल्या प्रकारें पूर्ण कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा सूड तूं उगीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या खचण्याच्या वेळीं आह्मास आश्रय दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, दावीदाच्या पडलेल्या मंडपास आश्रय दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विनंतीचें उत्तर दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी हाक मारितों त्या दिवशीं आह्मांस उत्तर दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या सर्व शत्रूंच्या हातांतून आह्मास सोडीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाईट विचारापासून आह्मास मोकळें कर. "

हे आमच्या आकांशातील देवा, आह्मावर तुझा आशीर्वाद होण्याविषयीं आज्ञा कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास तुझें तारण मि॰

मिळावें, ह्मणून आज्ञा कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या उद्धाराचा वेळ आह्माजवळ आण. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या तारणाचा दिवस आह्माजवळ आण. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करायासाठीं आह्मास जवळ ने. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा वाद करून आह्मास सोडीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांच्या दुःखाकडे पाहा. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचें रोग दूर कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, जुलूमाच्या वेळीं आह्माकडे पाहा. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें ओरडणें मान्य कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांमध्यें शांति राख. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाड्यांत सुख असूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या प्रभुराजास जीवन व शांति दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, त्याच्या मनांत आह्मांविषयीं चांगलें घाल. "

हे आमच्या आकाशांतीलदेवा, पृथ्वीवर शांतता असूंदे. אמן
हे आमच्या आकाशांतील देवा, जगांत तृप्तता असूं दे. "
हे आमच्या आकाशांतील देवा, या राज्यांत शांतता असूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, पृथ्वीवर दंहिवर व पर्जन्य आशीर्वादरूप व्हावे; ह्मणून त्यांच्या योग्यसमयीं त्यांस पडूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, पेरायास बीज व खावयास भाकर दे.

हे आमच्या आकाशांतील देवा, (आमच्या) कुटुंबाच्या संख्येप्रमाणे भाकर देत ऐस. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची प्रार्थना तुजसमोर धूपासारिखी मानिली जावो. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें चांगलें होण्याची, आमचें तारण होण्याची, आणि आह्मास दया प्राप्त होण्याची, खूण कर; मग आमचे द्वेष्टे पाहून लाजतील, आणि आमचे शत्रू अवलोकन करून घाबरतील; कारण तूंच आमचें सहाय व समाधान करणारा आहेस. क्रोधाच्या समयीं (आब्राहामावर झालेली) दया स्मर; क्रोधाच्यासमयीं (इसहाकाचें) बांधले जाणें स्मर; क्रोधाच्या समयीं (याकोबाची) पूर्णता स्मर; आणि क्रोधाच्यासमयीं प्रीति आठवून, त्वां आह्माबरोबर केलेला करार न मोडतां, या वेळीं व या दुःखांत आह्मास उत्तर दे.

אלהים אתה ידעת हे देवा, माझे मूर्खपण व माझे अतिक्रम तुला कळले आहेत, आणि माझा सर्व गर्व तुजपुढें गुप्त नाहीं; ह्मणून जेव्हां मी आपल्या मनांत पुष्कळ वि-

चार करितों, तेव्हां मी पाण्यासारिखा रिचविला जातों, आणि माझी हाडें खिळखिळीं होतात. तुझा दयेचा दरवाजा ठोकणारा करितां, आणि तुजपासून क्षमा मागण्याकरितां, जे भिकाऱ्यासारिखे उभे आहेत, त्यांकरितां कोपाच्यासमयीं तूं दया स्मर; कारण तुझा मोठेपणा कळविण्याकरितां माझे डोळे रात्रीच्या प्रहराची वाट पाहातात; मी या पिढीला तुझें बळ, व जो येईल, त्याला तुझा पराक्रम दाखवीन. माझे डोळे उघड, मग मी तुझा शास्त्रांतील अद्भुत कृत्यें पाहीन; आश्चर्य गोष्टींच्या वेळाची वाट पाहाणारे तुझ्या नामाचें कीर्तन करितात; ह्मणून तूं त्याच्या विखरलेल्या वस्त्या सर्व प्रदेशांतून परतीव; कारण तूंच परमेश्वर सैन्याचा देव आहेस. हे सैन्याचा देवा, आह्माकडे फीर, तूं न्यायानें आह्मास भयंकर उत्तर दे, तुझा अभिषिक्त दाखीव आणि आमची ढाल (तारणारा) आह्मास पाहूं दे; मग जे तुजवर भरंवसा ठेवितात, ते सर्व आनंदीत होऊन सर्वकाळ हर्षशब्द करितील. हे आमच्या बापा आह्मास उत्तर दे.

עננו אבינו हे आमच्या बापा, आह्मास उत्तर दे.

עננו आह्मास उत्तर दे.

हे आमच्या उत्पन्न कर्त्या, आह्मास उत्तर दे. עננו

हे आमच्या उद्धारका, आह्मास उत्तर दे. "

हे आह्माविषयीं चौकशी ठेवणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे तेज व महत्त्व यांनी वेष्टिलेल्या, आह्मास उत्तर दे. "

हे सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे यथार्थ व सरळ (देवा,) आह्मास उत्तर दे. "

हे जिवंत व निश्चल (देवा) आह्मास उत्तर दे. "

हे निर्मळ दृष्टीच्या, आह्मास उत्तर दे. "

हे आकाशांत राहणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे सर्व शक्तिमान (देवा) आह्मास उत्तर दे. "

हे दुष्टाईची आवड न धरणाऱ्या, आह्मास उत्तर दे. עננו
हे राजा, व राजांच्या राजा, आह्मास उत्तर दे. „
हे भयंकर व गडरूप (देवा,) आह्मास उत्तर दे. „
हे पडलेल्यांस आश्रय देणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे गरीबांचें सहाय करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे खंडून घेणाऱ्या, व संकटांतून मुक्त करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे यथार्थ आणि यथार्थ ठरविणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे हाक मारणाऱ्यांच्या जवळ असणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे उंच व महत्त्ववान् (देवा), आह्मास उत्तर दे. „
हे आकाशांत वस्ति करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे पूर्ण लोकांच्या आश्रया, आह्मास उत्तर दे. „

עננו מלך מלכי המלכים हे राजा, आणि राजांच्या राजा, आह्मास उत्तर दे.
हे आब्राहामाच्या देवा, आह्मास उत्तर दे.
हे प्रसन्नतेच्यावेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे इसहाकाच्या भयपात्रा, आह्मास उत्तर दे.
हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे याकोबाच्या बळदाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे दयेच्यावेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे दावीदाच्या रक्षका, आह्मास उत्तर दे.
हे (करूबांच्या) रथांत बसणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे दयावंता, व कृपावंता, आह्मास उत्तर दे.

रחום וחנון हे दयावंता व कृपावंता, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אדון הסליחות हे क्षमाशील देवा, मने पारखणाऱ्या, खोल गोष्टी प्रगट करणाऱ्या, आणि सत्य वक्त्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

הדור בנפלאות हे चमत्काराने सुशोभित, सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, पूर्वजांच्या कराराची आठवण राखणाऱ्या आणि गुप्त कर्मे शोधणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर

טוב ומטיב לבריות हे मनुष्यमात्रांशी चांगला असणाऱ्या, व चांगलें करणाऱ्या, सर्व गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, (आमचे) अपराध धूळीस मिळविणाऱ्या व सात्विकपणा परिधान करणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

מלא זכיות हे यथार्थतेनें भरलेल्या, स्तुतीनें भयंकरा, दोष क्षमा करणाऱ्या आणि संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

פועל ישועות हे उद्धारका, भविष्य जाणणाऱ्या, पिढ्यांस बोलविणाऱ्या (उत्पन्न करणाऱ्या,) प्रार्थना ऐकणाऱ्या, आणि पूर्ण बुद्धीचा, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אל רחום שמך तुझें नाव दयाळू देव व तुझें नाव कृपाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל אדיר שמך तुझें नाव बळवंत, धन्य, मोठा व कीर्तिमान देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל הדור שמך तुझें नाव सुशोभित, न्यायी, यथार्थ व कृपाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל טהור שמך तुझें नाव निर्दोष, एकच, पराक्रमी व अनादी देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל מלך שמך तुझें नाव राजा, भयंकर, आश्रय देणारा व सहाय करणारा देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל פודה שמך तुझें नाव उद्धारक, सात्विक, पवित्र व दयाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל שדי שמך तुझें नाव विश्वंभर, पूर्ण, आधार देणारा व प्रबळ देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל רחום שמך तुझें नाव दयाळू देव, तुझें नाव कृपाळू देव, तुझें नाव मंदक्रोधी देव, व तुझें नाव करुणासागर असें आहे; आणि तुझें नाम आह्मामध्यें गाजीवलें जातें; ह्मणून तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर.

पश्चात्तापाच्या दाहा दिवसांतच मात्र खालीं लिहिलेलीं वाक्यें ह्मणावीं.

יי חננו והקימנו हे परमेश्वरा, आह्मावर दयाकरून आह्मास स्थापित कर.

וּבְסֵפֶר חַיִּים आणि आह्माविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे परमेश्वरा, कृपा करून तारणाचे दिवसाचें शुभवर्तमान आह्मास ऐकीव. וּבְסֵפֶר חַיִּים

हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा पूर आह्मावर येऊं दे. "

हे परमेश्वरा, कृपा करून तुझी दया आह्मापुढें येऊं दे. "

हे परमेश्वरा, आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. "

हे परमेश्वरा, आज आह्मास तूं आपल्या ऱ्हदयावर मोहोरीप्रमाणें करून ठेव. "

हे परमेश्वरा, आमचा वाद व आमची लढाई तूं कर. "

हे परमेश्वरा, आमचा अन्नपाण्यास आशीर्वाद दे. "

יי עֲשֵׂה לְמַעַן हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर. "

וְחוּסָה עַל יִשְׂרָאֵל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर. "

हे परमेश्वरा, तुझ्या पूर्णतेमध्यें जन्मलेल्या (आब्राहामाकरितां) आमची विनंती मान्य कर. וְחוּסָה עַל יִשְׂרָאֵל

हे परमेश्वरा, तुझ्या खांबांशी बांधला गेलेल्या (इसहाकाकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, आकाशांतून शिडीवरून उत्तर मिळालेल्या (याकोबाकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, तुझा यथार्थ योसेफ, याच्या पुण्याकरितां आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, पाण्यांतून काढलेल्या (मोशेकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, तुझ्या उरीम व थुम्मीमाने आचार्यपणा चा-

लविणाऱ्या (आहारोनाकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, तुझ्या नामाचा शुद्ध (खरा) आवेश धरणाऱ्या (पिनहासाकरितां) आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, (दाविदाच्या) सुंदर गीतांकरितां आमची विनंती मान्य कर. וחוסה על ישראל

हे परमेश्वरा, तुझ्या नामासाठीं मंदिर बांधणाऱ्या (शलोमो) राजाकरितां आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, तुझ्या नामाच्या एकत्वाकरितां, जे मारले व जाळले गेले, त्यांकरितां आमची विनंती मान्य कर. "

हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. "

עשה למען שמך (हे परमेश्वरा,) तूं आपल्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. तूं आपल्या सत्यतेकरितां, आपल्या कराराकरितां, आपल्या मोठेपणाकरितां, आपल्या नियमाकरितां, आपल्या महत्त्वाकरितां, आपल्या वचनाकरितां, आपल्या आठवणीकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या चांगुलपणाकरितां, आपल्या सरळपणाकरितां, आपल्या गौरवाकरितां, आपल्या मततत्वाकरितां, आपल्या राज्याकरितां, आपल्या अनाद्यंततेकरितां, आपल्या गुप्त भावाकरितां, आपल्या सामर्थ्याकरितां, आपल्या वैभवाकरितां, आपल्या यथार्थतेकरितां, आपल्या पवित्रतेकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या साक्षात्काराकरितां, आणि आपल्या शास्त्राकरितां, आमची विनंती मान्य कर.

עשה למען אברהם (हे परमेश्वरा), आब्राहाम, इसहाक व याकोब यांकरितां; मोशे व आहारोन यांकरितां; दावीद व शलोमो याकरितां; पवित्र यरूशालेम नगराक-

रितां; सीयोन, जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, त्याकरितां; तुझ्या नाश पावलेल्या मंदिराकरितां; तुझ्या ओसाड पडलेल्या वाड्याकरितां; गरीब इस्राएल लोकांकरितां; दरिद्री इस्राएल लोकांकरितां; दुःख सोसणाऱ्या इस्राएल लोकांकरितां; विधवा व पोरक्याकरितां; तान्हे बाळाकरितां; दुध पिण्याकरितां; शाळेंत शिकणारांकरितां व ज्याकडून कांहींच पाप घडले नाहीं, त्यांकरितां आमची विनंती मान्य कर.

עשה למענך जर आह्माकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां (आमची विनंती मान्य कर;) तूं आपणा करितां तसें करून आमचें तारण कर आणि आज व नित्य आमच्या प्रार्थना ऐकून आह्मास तार व आह्मास उत्तर दे; कारण तूंच आमचें स्तुतिपात्र आहेस.

דעני לעניי हे गरीबांस उत्तर देणाऱ्या,

עניגן आह्मास उत्तर दे.

हे दुःखीतांस उत्तर देणाऱ्या, עניגן

हे नम्र आत्म्याच्यांस उत्तर देणाऱ्या ”

हे उदासी मनाच्यांस उत्तर देणाऱ्या, ”

हे खिन्न आत्म्याच्यांस उत्तर देणाऱ्या, ”

हे आब्राहामास मोरिया डोंगरावर उत्तर देणाऱ्या, ”

हे इसहाकास स्थंडिलाच्या बाजूवर उत्तर देणाऱ्या, ”

हे याकोबास बेथएलांत उत्तर देणाऱ्या, ”

हे योसेफास बंदिशाळेंत उत्तर देणाऱ्या, ”

हे मोशेला व आमच्या पूर्वजांस सूफ समुद्राच्या (तीरीं)उत्तर देणाऱ्या, ”

हे आहारोनास धूप दाखवितांना उत्तर देणाऱ्या, ”

हे पिनहासास शित्तीमांत उत्तर देणाऱ्या, ”

हे यहोशुवास गिलगालांत उत्तर देणाऱ्या, עֲנֵנוּ
हे एलीस रामांत उत्तर देणाऱ्या, "
हे शमुएलास मिजपांत उत्तर देणाऱ्या, "
हे दावीद व त्याचा पुत्र शलोमो यांस यरूशालेमांत उत्तर देणाऱ्या, "
हे एलीयास कार्मेल डोंगरावर उत्तर देणाऱ्या, "
हे एलीशास येरीहोंत उत्तर देणाऱ्या, "
हे हिज़्कियास रोगाचे समयीं उत्तर देणाऱ्या, "
हे योनास माशाच्या पोटांत उत्तर देणाऱ्या, "
हे हनानया, मीशाएल आणि आजार्या यांस जळत्या अग्नीच्या भट्टींत उत्तर देणाऱ्या, "
हे दानीएलास सिंहाच्या गुहेंत उत्तर देणाऱ्या, "
हे मुर्दैखाय व एस्तेर यांस शूशान राजवाड्यांत उत्तर देणाऱ्या, "
हे एज्रास दासत्वांत उत्तर देणाऱ्या, "
हे होनीस कुंडलींत*उत्तर देणाऱ्या, "
हे पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर देणाऱ्या,"

---

* एन इस्राएल या नावाच्या एका ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, होनी हा कोणी सात्विक मनुष्य होता; तो ज्या देशांत राहत असे, त्या देशांत ईश्वरी अवकृपेमुळें पर्जन्य पडला नाहीं. तेव्हां तेथील सर्व लोकांनी त्याजवळ येऊन असी विनंती केली कीं, आपण देवाजवळ काकळूत करून पर्जन्य मागावा. मग त्यानें आपणा भोंवतें कुंडली करून असी शपथ वाहिली कीं, ईश्वर या देशावर पर्जन्य पाडील तेव्हांच मी या कुंडलींतून बाहेर पडेन. असी शपथ करून तो तेथे ईश्वरास विनवीत बसला असतां, पर्जन्याची शिडशिडी आली; परंतु त्याचे शिष्य

רחמנא עניגן हे दयावंता, आह्मास उत्तर दे; हे दयावंता, आमचा उद्धार कर; हे दयावंता, आह्मास सोडीव; हे करुणासागरा, आह्मावर, आमच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यावर आणि आमच्या सर्व इस्राएल बांधवांवर दयाकर; आणि तूं आपल्या मोठ्या नावाकरितां आह्मास अंधारांतून काढून उजेडांत आण.

אם אפס जरीं पाखर घातलेला घरोटा*नाहींसा झाला आहे, आणि जरीं नांदती राहोटी ओसाड पडली आहे; तरीं (हे देवा) आमच्या वृद्ध बापाकरितां (आब्राहामाकरितां) तूं आमचा नाश करूं नको. (ज्यास असी आज्ञा झाली होती कीं,) तूं आपला प्रिय पुत्र घे, आणि त्याचें रक्त स्थंडिलाच्या बाजूस पीळ, त्याची तूं भीड धर; कारण आह्मी त्याच्या पुण्याची तुजपुढें आठवण करितों. (असी आज्ञा होतांच) आणि त्याचा जीव त्यासीं गुंतला असतांहि; तो आपला पुत्र पवित्र करायास (अर्पायास) धांवला; आणि त्याच्या देवाचा मुगूट (देवाची कृपा) त्याच्या डोईवर असतांहि, त्यानें त्यास सरपणानें व अग्नीनें वेष्टिलें. तो एकुलता हरणाप्रमाणें त्वरित चालत असतां ह्मणाला, बापा, पाहा, आपण अग्नी व सरपण आणिलें आ-

---

त्यास ह्मणाले कीं, त्वा शपथीपासून मोकळें व्हावें ह्मणूनच ती शिडशिडी आली, तेणेकरून देशांत चांगलें पीक होणार नाहीं. असें ऐकून तो आणखी प्रार्थना करूं लागल्यावर पावसाची झोड लागली. तेव्हां त्याचे शिष्य त्यास ह्मणाले कीं, अशा पर्जन्यानें आमची अधिक नासाडी मात्र होते. मग तिसऱ्या वेळीं त्यानें प्रार्थना केल्यावर चांगला पाऊस पडूं लागला. असे त्याचे शिष्य तृप्त झाल्यावर तो त्या कुंडलींतून बाहेर निघाला.

---

* ईश्वराच्या वैभवानें भरलेलें पवित्र मंदिर.

हे; परंतु भेटीसाठीं कांहींच आणिलें नाहीं. तेव्हां पुत्र घाबरूं नये, यासाठीं बाप मृदू शब्दें करून उत्तर देऊन ह्मणाला; हे माझ्या पुत्रा, देव आपणाकरितां तें पाहून मिळवील; आणि त्याविषयीं कसें तें परमेश्वर आपणास कळवील. (हे देवा) तुझ्या आज्ञा त्या दोघांनीहि सांभाळल्या, आणि तुझ्या मागून वळायास संशय नघेतां, उतावळीने व घाईने एका डोंगरावर गेले. त्यांनी एक लोंबतें ढग पाहिल्यावर एका आवडीने (प्रेमानें) होमाची लांकडें व आणखी सर्व उतावळीने सिद्ध केलें, आणि रानांतील मार्ग (अर्पणाची जागा) नीट केले. जेव्हां त्या एकुलत्याने पाहिलें कीं, अर्पणासाठीं कोंकरा पाहिजे तो तोच आहे; तेव्हां तो आपल्या परीक्षित बापास ह्मणाला, जसें शेरडूं अर्पितात, तसें तूं मला कर; मजवर दया करूं नको व मला लपवून ठेऊं नको. माझी आवड व इच्छा तसीच आहे माझें मन अवांकत नाहीं; जरीं तूं माझा शेवट करायास (अर्पायास) हयगई केलीस, तरीं माझा आत्मा व माझा जीव त्याकडे परत घेतला जाईल. मग त्याने त्याचे हात व पाय बांधून आपली तरवार तपासून पाहिली, आणि त्यास लाकडांवर ठेवायास त्वरा करून स्थंडिलावर अग्नीहि पेटविला. मग पुत्राने आपली मान लांबविल्यावर, त्याचा बाप आपल्या स्वामीच्या नामाकरितां त्यास वधायास जवळ आला असतां, पाहा, देव येऊन त्याजवळ उभा राहिला. जें कांहीं तो करीत होता, तें पाहिल्यावर, असें दिसून आलें कीं, हा बाप आपल्या पुत्रामुळें उगाच राहिला नाहीं; त्याने आपलें मन हातावर घेतलें होतें. मग लवकरच (देवाने) त्यास हांक मारुन ह्मटलें कीं, पाहा, तुझ्या ताडलेल्या पुत्राबद्दल (अर्पायास) एक एडका आहे, तो घे आणि अर्प; उशीर करूं नको. (हे देवा), त्याच्या स्वासा-

बद्दल जें वाहतों तें धुपासारिखेच स्थाप (मान्य कर), आणि तें अर्पण व त्याबद्दल आह्मी जें वाहतों, तेंहि तुजपुढें चढूं दे.

זכרון לפניך (आमची) आठवण तुजपुढें आकाशांत सर्वकाळ राहावी; ह्मणून ती पुस्तकांत कोरून ठेव, आणि आब्राहाम व इसहाक यांबरोबर केलेला सर्वकाळचा करार तूं मोडूं नको. तुला हाक मारणारे तुजपुढें नमन करायास येतात, तर संकटसमयीं बांधला गेलेला (इसहाकास) उठीव (स्मर); आणि तुझ्या शेरडांची दयेने पाहणी करून त्यांचें तोंड पट्टेदारांकडे लाव (त्यांस अन्य लोकांपासून वेगळें कर.) हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, तुझ्या गौरवास उठवून, जे झोपीं गेले आहेत, त्यांस जागृत कर; आणि जे दूर केलेले तुझ्यामुळें कांपत, आज पाहांटेस तुजपासून क्षमा मागायास आले आहेत, त्यांस तुजसाठीं खंडून काढ.

אל מלך पृष्ठ ९

סלח לנו אבינו हे आमच्या बापा, आह्मी पाप केलें आहे; ह्मणून आह्मास क्षमा कर; हे आमच्या राजा, आह्मीं उल्लंघनें केलीं; ह्मणून आह्मास माफ कर. कां तर हे प्रभू! तूं चांगला, क्षमाशील आणि जे तुला हांक मारितात त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तूं आपल्या प्रसन्नतेनें सियोनेंचें बरें कर; यरूशालेमाची गांवकुसें बांध. तेव्हां नीतीचे यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडतील, तेव्हां तुझ्या वेदीवर खोंडाचे होम करितील.

(सुंता अथवा दुसरें कोणतेंही शुभकार्य असल्यास एथून אתאנו पर्यंत सोडावें, आणि तें बोलल्यावर שומר ישראל बोलावें.)

למתודה חטאתיו (हे क्षमाशील देवा, तुझ्यामागून वळलेला इस्राएल) आपलीं पापें कबूल करायास, आणि पुष्कळ वाढलेले अतिक्रम पत्कारायास आला आहे; त्यांचीं वर्षें व्यर्थतेमध्यें व त्याचें आयुष्य दुःखांत संपलें; ह्मणून तो आपल्या संकटामुळें, आणि जे त्यांवर उठतात त्यांच्या वादामुळें ओरडत आहे.

נפלה נא (ते ह्मणतात), आह्मी परमेश्वराच्या हातांत पडूं कांकीं त्याची दया मोठी आहे.

מהיותי משכתי मी आपल्या सर्व आयुष्यांत दुष्टपणाच्या दोऱ्यांनी अन्याय ओढिले, ह्मणून मी फिरून पश्चात्ताप करितों; कारण कोणत्यादिवशीं माझा न्याय होईल तें मी जाणत नाहीं. आणि कदाचित माझा उद्धारक मजवर दया करील, ह्मणून मी आपले मांस अर्पितों (दुःख केल्यावरून मी शुष्क होतों) आणि आपल्या डोळ्यांतील अश्रू वाहातों; कारण त्याची दया नाहींसी झाली नाहीं. נפלה נא

שדי גילי माझ्या हर्षाचीं स्तनें कोरडीं पडलीं, ह्मणून मी पेथेन सर्पाचें विष चोखितों; आणि दगडाप्रमाणें कठीण झालेल्या दुःखामुळें माझ्या डोळ्यांतील पाणीं आटून गेलें. ते बापाच्या दयेसाठीं आग्रह करितात परंतु तो लेंकरावर दया करीत नाहीं; त्याच्या आंतड्यांतील (मनांतील) कळव-

ळा व त्याची करुणा मजवरून बंद झाली आहे. נפלה נא

הביאני בבור त्यानें (देवानें) मला सिंहाच्या गुहेंत नेऊन टाकिल्यावरून त्यांचा क्रोध माझें वतनच झालें आहे; त्यानें मला बंदीशाळेंत सोडिलें आहे, आणि तेथील रोषाच्या समुद्रांत मला बुडविलें आहे; परंतु जेव्हां त्याचा राग मजवरून फिरेल, तेव्हां नित्य मजकरितां चमत्कार उतरतील (केलेजातील). तरीं आतां देव कृपा करायास विसरला कीं काय ? त्यानें आपली ममता रागानें आटोपली कीं काय ?

(कोणी למתודה यावद्दल בזכרי ह्मणतात)

בזכרי मी बिछान्यावर आपल्या मनांतील अहंकाराची व अतिक्रमांची आठवण करून, देवाच्या घरीं त्याच्या पादासनांजवळ उठून आलों आहें; आणि आपले डोळे उंच करून त्याच्या आकाशाकडे विनंती करीत आहें. נפלה נא

לך אלי हे देवा, माझ्या सामर्थ्याच्या खडकरूप आश्रया (तुला मी विनवितों;) हे संकटसमयीं आश्रय देणाऱ्या, या प्रवासांत मी आपली आशा, आवड व इच्छा तुजवर ठेविली आहे; माझ्या मनांतील सर्व मागण्या व माझ्या सर्व वांछा तुजसमोर आहेत; यास्तव तुजकडे ओरडणाऱ्या तुझ्या चाकरास त्याजवर अधिकार करणारांच्या व त्याजवर उठणारांच्या हातांतून सोडीव. נפלא נא

עננו יי עננו हे परमेश्वरा, संकटसमयीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; मला उत्तर दे; मग लोक असें समजतील, कीं तुझा हात आखूड नाहीं; आणि जो गरीब शत्रूच्या वादामुळें ओरडून, आपलीं उल्लंघनें व गु-

मांत केलेलीं पापें तुजपुढें कबूल करीत आहे, त्याचें दुःख तूं धिःकारूं नको. נפלה נא

מה יתאונן मातीचा घडलेला (मनुष्य) ज्याचें शरीर बारीक धुळीसारिखें चेंचरलें जाईल, तो काय निमित्त देईल? काय ह्मणेल? काय सांगेल? आणि आपणास यथार्थ कसें मानील? जरीं तो दोषी अथवा यथार्थ असला, तरीं हे देवा, तो तुला काय देईल? त्याचीं वचनें व कर्म्यें कालवृत्तांताच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत काय? נפלה נא

חצות לילה तुझें सेवक अर्ध रात्रीं उठून तुझी स्तुति करीत आले आहेत; हे याकोबाच्या पवित्रा, त्यांस खंडून घेणाऱ्या, त्यांच्या पूर्वजांचें पुण्य त्यांकरितां तूं आठीव, आणि त्यांचीं कुत्सित कर्में मनावर धरूं नको; पूर्वींच्या दिवसाप्रमाणें तूं आपल्या समुदायास खंडून घे; मग वर (आकाशांत) शांति राखणारा देव उंचाविला जाईल. נפלה נא

भूमीवर पडून हें बोलावें.

ויאמר דוד तेव्हां दावीदानें गादाला ह्मटलें, मी फार संकटांत आहें, आतां मी परमेश्वराच्या हातांत पडेन; कांकीं त्याची दया मोठी आहे, आणि माणसाच्या हातांत न पडावें.

רחום וחנון हे दयाळू व कृपाळू, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे; तर आह्मावर दया कर व आह्मास तार.

गीत २५

" לדוד אליך " हे परमेश्वरा, मी आपला जीवात्मा तुझ्याकडें वर लावितों. हे माझ्या देवा, म्या

तुजवर आशा ठेविली आहे; म्या लज्जित न व्हावें, माझ्या शत्रूंस मजवर हर्ष देऊंनये. जे तुझ्या आशेवर राहतात, ते सर्व लज्जित न व्हावे; जे उगेच दगा करितात, ते लज्जित व्हावें. हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला कळीव, आपल्या वाटा मला शिकीव. तूं आपल्या सत्यतेच्या मार्गानें मला चालीव आणि मला शिकीव, कारण कीं तूं माझ्या तारणाचा देव आहेस; सर्व दिवस मी तुजवर आशा ठेवितों. हे परमेश्वरा, तूं आपल्या फार ममतेची, आपल्या फार दयेची आठवण कर, कांतर त्या सर्वकाळापासून आहेत. हे परमेश्वरा, तूं माझ्या बाळपणांतलीं पापें, आणि माझे अतिक्रम आठवूं नको; तुझ्या दयेप्रमाणें, तुझ्या चांगुलपणा मुळें माझी आठवण कर. परमेश्वर चांगला व नीट आहे; यास्तव तो पाप्यांस मार्गीं लावितो. दीनास न्यायानें चालवितो; आपलाच मार्ग दीनांस शिकवितो. जे परमेश्वराचा करार व त्याचे नेम पाळितात, त्यांसीं त्याच्या सर्व वाटा दयारूप व सत्यतारूप आहेत. हे परमेश्वरा, तूं आपल्या नामामुळें माझा अन्याय क्षमा कर, कारण कीं तो मोठा आहे. जो माणूस परमेश्वराला भितो, तो कोण ? त्यास तो निवडलेल्या मार्गांत शिकवील. त्याचा जीव सुखी राहील, आणि त्याचें संतान पृथ्वीचें वतन पावेल. परमेश्वराचें रहस्य त्याच्या भिणाऱ्यांसी आहे, आणि तो आपला करार त्यांस कळवील. माझे डोळे परमेश्वराकडे नेहमी आहेत, कारणकीं, तो माझे पाय जाळ्यांतून काढितो. तूं मजकडे पाहा आणि मजवर दया कर; कारण कीं मी एकला व दुःखित आहें. माझ्या ऱ्हदयांतलीं संकटें वाढविलेलीं आहेत; तूं माझ्या पेंचांतून मला काढ. माझें दुःख व माझे कष्ट पाहा, आणि माझीं सर्व पापें क्षमा कर. माझ्या शत्रूंवर पाहा कांकीं ते बहुत

आहेत, आणि त्यांनी कठोर द्वेषानें मला द्वेषिलें आहे. तूं माझा जीव राख आणि मला सोडीव; म्या लज्जित न व्हावें, कां तर मी तुजवर आशा ठेविली आहे. यथार्थपण व नीटपण यांनी मला राखावें; कां तर मी तुजवर आशा ठेवितो. हे देवा, इस्राएलाला त्याच्या सर्व संकटांतून खंडून काढ. तोच इस्राएलाला त्याच्या सर्व अन्यायांतून खंडून घेईल."

"אלהי ישראל" हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या रागाचा संताप सोड, आणि आपल्या लोकांवरच्या या वाईटाविषयीं पश्चात्ताप कर (मन पालट).

रविवारची प्रार्थना.

"שועת עמך" हे परमेश्वरा, तुझ्या लोकांच्या ओरडण्याकडे कान लाऊन, आमचें बरें होण्याची खूण कर; कारण तुझ्या इस्राएल लोकांसारिखें दुसरें कोणतें राष्ट्र आहे? त्यांस सिंहाच्या दातांपासून सोडवून, चोहोंदिशांपासून एकवट कर; आणि त्यांतील एक प्रत्येकाच्या जवळ आण. तुझी राहोटी (मंदिर) जडून एक होण्याकरितां, सियोनेच्या विलापाचें शांत्वन कर; आणि भटकत फिरणाऱ्या आहोलीबावर* तूं दया कर. एदोम व मोआब यांनी माझा जीव खांचेंत नाहींसा केला; त्यांनी निंदाकरून माझ्या गालावर चपराका मारिल्या; एक इकडून व एक इकडून. गुप्तांत त्यांनी मजकरितां फांस मांडिला व खांच खणिली; त्यांनी मजविरुद्ध एकत्र फुसफुस केली, चांगलें करणारा कोणी नाहीं, एक देखील नाहीं. हे मजबूत आकाशांत वस्तिकरणाऱ्या, तूं आपल्या लोकांस धैर्य दे; मग तुझे शत्रू नाहींसे व दंडास पात्र होतील; आणि परमेश्वर

* येहेजके २३, ४ एथे आहोलीबा हे नाव विटाळलेल्या येरूशालेमेस दिल्हें आहे.

सर्व पृथ्वीवर राजा होईल, त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नामहि एकच.

सोमवारची प्रार्थना.

יי יחיד לבות हे परमेश्वरा, मनुष्य पुत्रांचीं मनें शोधणारा व गहन मोठालीं कर्म्यें करणारा तूं एकटाच आहेस; (तुझ्याच सामर्थ्यानें) संध्याकाळ व सकाळ होऊन दुसरा दिवस झाला. तुझ्या सेवकाचें हाई व ह्मणणे ऐक, त्याच्या खांद्यावर प्रवासाचें ओझें आहे; तर त्याच्या पडण्याच्या दिवशीं त्यास उठवायास एकावांचून दुसरा नाहीं. जे लोक तुजसमोर ओरडत आहेत, त्यांकरितां तुझ्या कराराची आठवण कर; तुझा सेवक याकोब, याच्या पुत्रांचे दुसऱ्यानें (तारण होण्यास) आज्ञा कर. हे माझ्या प्रियकरा, आमची विनंती ऐक, आणि सुआराचा पुत्र नेथानिएल यानें दुसऱ्या दिवशीं अर्पिलेल्या होमाच्या पुण्याईकरितां आमची प्रार्थना नजराण्याप्रमाणें मान्य कर. तुझ्या लोकांच्या प्रार्थनेकडे कान लाव, आणि आह्मासाठीं तुझ्या पुण्याचा अभिषिक्त पाठीव; मग आह्मी तुजपुढें सकाळीं एक व संध्याकाळीं एक असे मेंढे अर्पण करूं. हे माझ्या राजा, माझे मन धीट कर, आणि जर माझा मार्ग गुप्त आहे, तर माझा अंधार प्रकाशित करायास त्वरा कर, आणि आज सोमवारीं तूं आपल्या सेवकास सफल कर.

मंगळवारची प्रार्थना.

יי דלו עיני हे परमेश्वरा, वर पाहून माझे डोळे थकले आहेत; हे प्रभू ! माझ्या दुःखामुळें मी ओरडतों; आणि मला फार क्लेश व यातना झाल्यामुळें माझा आत्मा माझ्यांत बुडून जातो; ह्मणून मी आपला जीव ईश्वरापुढें ओतितों (मी आपला मनोदय ईश्वराजवळ कळवितो). हे अनंता ! माझें ह्म-

णतें ऐकून माझें चांगलें होण्याची खूण कर; कारण हे परमेश्वरा, त्वां पुष्कळ (चांगलें) केलें आहेस. हे यथार्थ देवा व तारका, मी दुबळा आहे, मला तार; म्या तुझ्या तारणाची वाट पाहिली आहे. जरीं माझे शत्रू मजवर उठतात, तरीं माझें मन भिणार नाहीं; कारण हे परमेश्वरा, म्या तुजवर आशा ठेविली आहे. हे माझ्या रक्षका, तरवार नाहीं, परंतु मी आपला हात तुझ्यामुळें उभारितों; कारण तरवार व भाला यांकडून परमेश्वर संरक्षण करीत नाहीं. माझे शत्रु वाढले व ते मजवर अधिकार करूं लागले असतां, हे परमेश्वरा, तूं आपणास आकळिशील काय? हे सूड घेणाऱ्या, आणि रोषयुक्त देवा, त्वां आपलें तोंड कां लपविलें? पाहा, शत्रुने मला वेढिलें आहे. देव सर्वकाळ आव्हेरील काय? असा माझा जीव विचार करितो; व त्यामुळें माझें मन घाबरतें. गर्विष्ठ मजसीं वाद करितात; परंतु माझे विचार मला उत्तर देतात कीं, देव सर्वकाळ आव्हेरणार नाहीं. तुझ्या दयेची मी आवड धरितों; कारण हे परमेश्वरा, मी तुझीच वाट पाहतों; हे प्रभू देवा, तूंच मला उत्तर दे.

बुधवारची प्रार्थना.

אם גדל ״ हे परमेश्वरा, जरीं माझा दंड सोसण्यापेक्षां अधिक झाला असेल, आणि म्या वेडेपणा केला असेल, तरी तूं आपल्या चाकराचा न्याय करायास येऊं नको. माझ्या मनांवर झालेले घाय लक्षांत आण, माझ्या तारुण्यांतील पापें पार कर; आणि आपल्या सेवकाला गर्विष्ठ लोकांपासून आवरून धर. माझा शोक वाढला आणि माझ्या कण्हण्यामुळें माझें मन भंगलें असतां, तूं आपल्या दासाचा जीव हर्षित कर. माझे वाईट इच्छिणारे मजवर वाढले, माझ्या नाशामुळें ते आनंदित होतात; ह्मणून तूं आपल्या चाकरापासून आपलें तोंड

लपवूं नको. न्याय नाहीं, ह्मणून मीं कोठपर्यंत ओरडूं? माझ्या पाठीं लागणाऱ्यांचा न्याय तूं केव्हां करशील? तुझ्या सेवकाचे दिवस किती आहेत? तूं आपल्या चाकरास ह्मटल्याप्रमाणें मजवर दया करायास आपला राग फिरीव; आणि माझें शांतवन करायास तुझी कृपा होऊं दे. ऱ्या आपल्या चाली सविस्तर सांगितल्या; मी उदरांत होतों, तेव्हांपासून तुजवर विश्वासलों होतों; ह्मणून तूं आपलें तोंड आपल्या चाकरावर प्रकाशित कर. हे एकुलत्यांस परतिवणाऱ्या खडकरूप आश्रया, ज्या सर्व दया त्वां आपल्या दासावर केल्या आहेत, त्यांस मी अयोग्य आहे. माझ्या पापापासून मला शुद्ध कर, आणि माझ्या उसास्यापासून व ओरडण्यापासून आपला कान लपवूं नको; कारण हे परमेश्वरा, मी तुझा सेवक विनंती करीत आहें. तुझे चमत्कार मला दाखीव, तूं आपलें, तोंड मजपासून लपवूं नको, आणि रागानें आपल्या चाकरास नकारूं नको.

गुरुवारची प्रार्थना.

שעה נודד " हे परमेश्वरा, घरोव्यांतून (स्वदेशांतून) हांकून लावलेल्याकडे पाहा, त्याच्या डोळयांच्या झोंपेस सावध कर; ह्मणजे रात्र आहे इतक्यांत तो उठेल. त्याच्या अपराधाच्या लज्जेमुळें रात्रंदिवस त्याचीं आसवें त्याचें अन्न झालीं. असें झालें आहे कीं, तो प्रवासांत टाकला गेला आहे; डोंगरावरून टेंकडींपर्यंत त्याचा पाठलाग झाला आहे; दिवसास ऊन व रात्रीं थंडी त्यास सोसावी लागते. शत्रूनें मजवर जुलूम केला व मजवर मसलतहि केली; अवघी रात्र ते दबा धरितात. हे माझ्या तारणाच्या परमेश्वर देवा, माझी प्रार्थना तुजपुढें येऊं दे; रात्रंदिवस मी ओरडत आहें.

शुक्रवारची प्रार्थना.

אלהים ׳׳ हे परमेश्वर देवा, एकुलत्यास (प्रवासांतून) परतिवणाऱ्या, आज रात्रीं देवालयांत उभें राहाणाऱ्यांकडे पाहा. ज्या तुजवर भरंवसा ठेविला आहे, आणि रात्रीं आपल्या आंथरुणावर तुझ्या नावाची आठवण करितों. रडत जाणारावर दया कर; (कारण) रात्रीच्या भयामुळें प्रत्येक मनुष्यानें आपली तरवार आपल्या मांडिस (कंबरेस) बांधिली आहे. मज नमून चालणाऱ्या कडे पाहा, रात्रंदिवस कांहींच आधार मिळत नाहीं. तुजसमोर ओरडणाऱ्यास सकाळीं तुझी दया व रात्रीं तुझी सत्यता प्रगट करायास मोकळें कर.

प्रत्येक दिवसाच्या प्रार्थनेनंतर हे बोलावें.

שוב מחרון אפך तूं आपल्या रागाचा संताप सोड, आणि आपल्या लोकांवरच्या या वाईटाविषयीं पश्चात्ताप कर (मन पालट). हे परमेश्वरा, अतिशय कोपित होऊं नको, आणि सर्वकाळ अन्याय स्मरूं नको; आतां पाहा, दृष्टी लाव, आह्मी सर्व तुझे लोक आहों. तूं आपल्या नामाकरितां आह्मास धि:कारूं नको; तूं आपलें गौरवी सिंहासन अप्रतिष्ठित होऊं देऊं नको. जरीं आमचे अपराध आह्मास दोषी ठरवितात, तरीं हे परमेश्वरा, आठवण कर आह्माबरोबर केलेला करार तूं आपल्या नामाकरितां मोडूं नको; कांतर आमचीं मार्गें फिरणीं बहुत झालीं आहेत, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे; हे प्रभु, आह्मास क्षमा कर.

אם אשמנו जरीं आमचे अतिक्रम किर्मिजासारिखे लाल झाले आहेत; तरीं हे परमेश्वरा, खासद्यांच्या (हातांतून) वांचविलेला बाप (आब्राहाम), ज्याचें सामर्थ्य सिद्दिम खिंडींत (प्रगट) झालें, त्याच्या प्रीतीची आज आह्मांकरितां आठवण

करून, तुझ्या दयेचा पूर आह्मापुढें कर; कांतर आमचीं मागें फिरणीं बहुत झालीं आहेत, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे; हे प्रभू, आह्मास क्षमा कर.

אם חטאנו जरीं आह्मी पाप केलें व पुष्कळ थट्टा हि केली; तरीं शेरडाप्रमाणे नामांकित बांधला गेलेल्या (इसहाका) करितां, आणि ज्या बद्दल प्रसन्नतेसाठीं एडका ठेविला (अर्पिला) गेला, त्याचे बांधलें जाणे आज आह्माकरितां आठवून, आह्मास प्रसन्नतेचा वेळ समजूंदे; कांतर आमचीं मागें फिरणीं बहुत झालीं आहेत, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे; हे प्रभू, आह्मास क्षमा कर.

אם הרבינו פשע जरीं आमचीं उल्लंघनें व अन्याय वाढले आहेत; तरीं हे परमेश्वरा, जो पूर्ण (याकोब स्वप्नांत) शिडी पाहून भ्याला, आणि त्या भयंकर ठिकाणीं राहिला, त्याची पूर्णता आज आह्माकरितां आठवून, आमच्या विनंतीमुळें प्रसन्न हो; कांतर आमचीं मागें फिरणीं बहुत झालीं आहेत, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे; हे प्रभू, आह्मास क्षमा कर.

אתאנו לחלות आह्मी तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आह्मास लज्जित करूंनको, आतां आह्मास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आह्मास क्षमा कर आणि आह्मांसाठीं तुझ्या वस्ति स्थानांतून तारण व दया पाठीव.

אתאנו לבקש हे भयंकर, अघोर व संकटसमयीं संरक्षण करणाऱ्या, आह्मी तुझ्याजवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आह्मास जीवंत राख, आह्मावर दया कर आणि तुझें नाम आह्मांस ठेविलें जाऊं दे; आह्मास क्षमा कर आणि

आह्मासाठीं तुझ्या वस्ति स्थानांतून तारण व दया पाठीव.

מרנא דבשמיא हे आमच्या आकाशांतील प्रभू, जसा सेवक आपल्या धन्याची विनंती करितो, तसे आह्मी तुला विनवितों; चांगलें करायास आह्मास बुद्धि दे, आह्मास तुजपुढून रिकामें परतवूं नको.

מרנא דבשמיא हे आमच्या आकाशांतील प्रभू, जसा पाडाव करून नेलेला मनुष्य आपल्या स्वामीची विनंती करितो, तसे आह्मी तुला विनवितों. सर्व पाडाव करून नेलेले मनुष्य पैका भरून मुक्त होतात; परंतु तुझे इस्राएल लोक प्रार्थना व काकळूत करून मुक्त होतील. हे जिवंतांच्या व मेलेल्यांच्या आशापात्रा, तूं आपला उजवा हात उभारून आपलें तारण उगीव.

מתרצה ברחמים हे दयेने प्रसन्न होणाऱ्या, आणि काकळुतीनें शांत असणाऱ्या, गरीब व दरिद्री लोकांस तूं प्रसन्न हो, आणि त्यांविषयीं शांत ऐस. हे आमच्या सर्वकाळच्या तारणाऱ्या व पूर्वीच्या दिवसापासून आह्मास रक्षणाऱ्या, दूर देशांतून याकोबाचें तारण कर, आणि प्रवासाच्या देशांतून त्याच्या बीजास सोडीव.

מחי ומסי नाश करणारा व रक्षक, मारणारा व जीवंत करणारा, आणि सर्वकाळच्या जीवनासाठीं नर्कांतून चढविणारा तूंच आहेस. जेव्हां पुत्र अपराध करितो, तेव्हां त्याचा बाप त्यास शिक्षा करितो; परंतु जेव्हां बाप करुणा करितो, तेव्हां तो त्याचीं दुःखें दूर करितो. जो चाकर बंडावा करून जातो, तो बेडींत पडतो; परंतु जेव्हां तो आपल्या स्वामीजवळ येऊन पश्चात्ताप करितो, तेव्हां तो त्याची बेडी तोडून टाकितो. आह्मी तुझे ज्येष्ठ पुत्र असतां, तुजविरुद्ध पाप केलें आहे. पाहा! आमचा जीव

कृत्रिमाने व बंडाव्याने भरला आहे. पाहा, आह्मी तुझे सेवक असतां, तुजविरुद्ध बंडावा केला आहे; ह्मणूनच पाहा, आह्मी धिःकारलेले व दास झालों आहों, आणि शासन भोगीत आहों. आह्मी तुजपुढें असी प्रार्थना व काकळूत करितों, कीं, तूं आपल्या पुष्कळ दयेने या दासत्वांत आह्मी नाहींसे झालों नाहीं इतक्यांत, ज्या दुःखाचें प्राबल्य आह्मावर झालें आहे, त्यांतून आह्मास सोडीव. नाश करणारा, व रक्षक, मारणारा व जीवंत करणारा आणि सर्वकाळच्या जीवनासाठीं नर्कांतून चढविणारा, तूंच आहेस.

רחמים פשוטים आह्मी तुजपासून विस्तारलेली दया मागतों, कारण कीं तुजपाशीं पुष्कळ दया आहे; तूं आपल्या नामाकरितां आह्माबरोबर यथार्थतेने व दयेने वाग. हे परमेश्वरा आमच्या देवा, आह्मी मागतों ह्मणून, आह्मापासून, आमच्या घरांपासून, तुझ्या सर्व इस्राएल लोकांच्या घरांपासून व सर्व ठिकाणांपासून पटकी, तरवार, वाईट, दुष्काळ, दासत्व, लुटणे, नाश, मरी, भूत, कुकल्पना, वाईट रोग, आणि संकट यांस दूर कर.

חיים טובים आह्मी तुजपासून चांगलें जीवन मागतों, कांतर तुजपाशीं जीवनाचा झरा आहे; तूं आपल्या नामाकरितां आह्माबरोबर यथार्थतेने व दयेने वाग. हे परमेश्वरा आमच्या देवा, आह्मी मागतों, ह्मणून आह्मापासून; आमच्या घरांपासून, तुझ्या सर्व इस्राएल लोकांच्या घरांपासून व सर्व ठिकाणांपासून पटकी, तरवार, वाईट, दुष्काळ, दासत्व, लुटणे, नाश, मरी, भूत, कुकल्पना, वाईट रोग व संकट यांस दूर कर.

אליך יי हे परमेश्वरा, त्या आपले डोळे तुजकडे लाविले आहेत; तूं आपल्या दयेच्या मोठेपणाप्रमाणे माझ्या

काकळुतीची वाणी ऐक. मी तुझ्या नामावर भरंवसा ठेवून आपले हात पसरतों; गोष्टी घेतों (प्रार्थना करितों) आणि तुझ्या जवळ येतों. माझीं दुःखें वाढलीं व माझ्या (आयुष्याचीं) वर्षें संपलीं; कारण माझीं सर्व पापें तुजपुढें ठेवलेलीं आहेत. खेदामुळें माझा विलासी जीव गळाला; आणि तुझ्या सेवकाचा जीव उत्कंठतेने निघून जातो. हे माझ्या तारणाच्या देवा, माझें पाप पार (दूर) कर; आणि माझीं अश्रूंहि आपल्या शिशांत भरून ठेव (लक्षांत ठेव). क्रोधाच्या समयीं दया आठवून शांत हो, आणि तूं आपल्या सेवकाचा जीव हर्षित व शांत कर. माझ्या आयुष्यांतील दुःख, कष्ट व म्या (भक्षिलेला) कडू दवना यांची आठवण कर; तूं आपले साक्ष मजविरुद्ध कोठपर्यंत नवे करशील? माझ्या शत्रूने, वैऱ्याने व दुसमानाने माझा द्वेष केला आहे; जेव्हां मी तुझें भय धरून येतों, तेव्हां तूं माझें ह्मणणे ऐक. अहंकारी मनुष्यांनी मजकरितां गुप्तरूपें जाळीं व फांस मांडिले; त्यांत तुझ्या प्रियाचीं पाउलें सांपडतात. त्यांनी मजकरितां फांस मांडिले; मजविषयीं खोटी साक्ष दिल्ही; आणि अहंकारी मनुष्याने मला गिळिलें आहे; (आतां) तुजवांचून मला कोणी खडकरूप आश्रया (नाहीं). हे खडकरूप आश्रया, उरलेले व बंदांत पडलेले लोकांवर आपलें महत्व प्रगट कर; आणि गुप्त राखून ठेवलेला तुझा चांगुलपणा, तुझ्या उरलेल्यांस दे. जे फार दुःखाने गांजले आहेत, त्यांपासून तूं दूर राहूं नको; (त्याकरितां) तुझे सेवक आब्राहाम, इसहाक व इस्राएल यांची आठवण कर. हे उंचापेक्षां उंच असणाऱ्या, दुःखितांवर व तुझ्या प्रियकरांच्या बीजांवर व आवडत्यांच्या लेंकरांवर दया कर. दासत्वाच्या खांचेंत शोक करणारे तुजवर आशा ठेवितात, तूं आपल्या धार्मिक लोकांचा कोंब नीचत्वांतून उगीव. जोकड वाहणाऱ्यां-

स (दुःख सोसणाऱ्यांस) तूं हर्षित कर, त्यांच्या वैऱ्यांस विस्मित कर, आणि पहिल्याप्रमाणे तुझ्या सैन्याचा झेंडा चालूं (उडूं) दे. त्यांच्या विनंतीचें उत्तर दे, त्याच्या पडण्यास आधार दे, आणि पृथ्वीच्या कोपऱ्यांपासून त्यांच्या प्रवासांतून त्यांस परतीव. तुजकडे ओरडणाऱ्या लोकांस तूं खंडून काढ, ते मुक्यासारिखे मौन धरितात; हा प्रवास तुझ्या भटकत फिरणाऱ्यांस किती पुरे असा झाला आहे! हे कृप्याने यथार्थ (देवा), तूंच कर्ये पारखितोस; तुझ्या दयेकरितां (या दुःखरूप समुद्राच्या) तळापासून आह्मास काढ. जे परागंदा झाले व दुःखाच्या बेडीनें बांधले आहेत, त्यांस तूं एकवट कर; गर्विष्ठांनी त्यांस गिळलें, आणि तुझी साक्षांतपणाची राहोटी त्यांनी जाळून टाकिली आहे. हे दयावंतास, ज्या लोकांस कडू दवण्याचा रस पिवून तृप्त राहाणे भाग्य पडलें आहे, त्यांस तूं आधार हो; आणि असें तूं आपल्या तीन सेवका करितां कर. हे सर्व समर्थ (देवा)! तूं आपल्या सर्व कामांत उंचावलेला आहेस, कारण तूं यथार्थ व तुझें प्रावर्णहि यथार्थता आहे. हे माझ्या राजा, माझी प्रतीक्षा तुजमध्यें आहे; ह्मणून तूं माझे अपराध क्षमा कर; हे माझ्या देवा, तुझी सेवा करायासाठीं माझा मार्ग सिद्ध कर. तूं माझ्या प्रार्थनेकडे व ओरडण्याकडे लक्ष दे; कारण माझी आवड तुजमध्यें आहे; तुजविषयीं कोण साक्ष देणार नाहीं?

אבינו אב הרחמן हे आमच्या पित्या, आणि दयाळू बापा,

הושיענו למען שמך तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

हे आमच्या देवा आणि आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आह्मांवर संकट आलें आहे, आह्मी तुला हाक मारितों; आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आह्मावर तुझ्या दयेचें सैन्य लोट, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

जेव्हां आह्मी तुला शोधितों, तेव्हा तूं आह्मांस सांपड, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आज व नित्य आमची प्रार्थना मान्य कर, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आमच्या प्रतीक्षा करण्याविषयीं आह्मास लाजवूं नको, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

तुजपुढें चांगल्या आठवणीने आमचें स्मरण कर, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आमची करुणा कर व आह्मावर दया कर, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आमच्या अपराधाच्या विटाळापासून आह्मास शुद्ध कर, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

आतां आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे, आणि तूं आपल्या नामाकरितां आमचें तारण कर.

חמול על עמך तुझ्या लोकांचा कळवळा तुला येऊन तूं आपल्या वतनावर दया कर; तुझ्या पुष्कळ दयेप्रमाणे आमची करुणा कर. हे आमच्या राजा, आह्मावर कृपा करून आह्मास उत्तर दे.

אבינו מלכנו हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूंच आमचा पिता आहेस; हे आमच्या बापा व आमच्या राजा तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

אם הטבנו פועל जरीं आह्मी चांगलीं कामें क-रितों, तरीं तूंच आमचा बाप आहेस; आणि जरीं आह्मी वाईट कर्म्ये केलीं, तरीं तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

אם גבר פשענו जरीं आमचीं उल्लंघने वाढलीं आहेत, तरीं तूंच आमचा बाप आहेस; तूंच आमच्या तारणाचा खडकरूप आश्रय असून, तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

אם הרבינו אמר जरीं आह्मी आपलीं वचनें वाढ-विलीं (पुष्कळ बोललों), तरीं तूंच आमचा बाप आहेस; आह्मी माती आहों याचें तूं स्मरण राख, तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा आह्मावर दया कर.

אם לך חטאנו जरीं आह्मी तुजविरुद्ध पापें के-लीं आहेत, तरीं तूंच आमचा बाप आहेस; हे प्रभू, आह्मास क्षमा कर, कारण तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

לך יי קוינו हे परमेश्वरा, आह्मी तुझी प्रतिक्षा क-रितों, कारण तूंच आमचा बाप आहेस; आणि तूं आमचा बाप आहेस, ह्मणून तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

לך פרשנו שעל आह्मी आपले तळहात तुज-कडे पसरितों, कारण तूंच आमचा बाप आहेस; आह्मास अ-रोग्यता सांपडूं दे, कारण तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

חשה שלח משיח (तूं आपला) अभिषिक्त ल-वकर पाठींव, कारण तूंच आमचा बाप आहेस; तारणाचें फूल

प्रफुल्लित कर, कारण तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूंच आमचा पिता आहेस; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आह्मास कोणी नाहीं हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर.

אבינו מלכנו हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूंच आमचा पिता आहेस; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर दया कर. हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर कृपा करून आह्मास उत्तर दे; कारण आह्मांमध्यें कांहींच (चांगलीं) कर्ज्ये नाहींत. तूं आपल्या मोठ्या नामाकरितां आह्माशीं यथार्थता व दया कर, आणि आह्मास तार; आह्मी काय करावें हें आह्मी जाणत नाहीं; आमचे डोळे तुजकडे लागले आहेत. हे परमेश्वरा, तुझी दया व कृपा आठींव; कारण त्या सर्वकाळापासून आहेत. हे परमेश्वरा, जसी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे; तसी तुझी दया आह्मावर होवो. आमचीं पूर्वींचीं पापें आठवूं नको; त्वरेने तुझी दया आह्मांपुढें कर; कारण आह्मी फार नीचावलों आहों. आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्न करणारा जो परमेश्वर, त्याच्या नामाने आह्मास सहाय आहे. हे परमेश्वरा, आह्मांवर कृपा कर, आह्मावर कृपा कर, कांतर आह्मी फार तुच्छ झालों आहों. क्रोधाच्या समयीं (आब्राहामावरील) प्रीति तूं आठींव; क्रोधाच्या समयीं (इसहाकाचें) बांधले जाणें आठींव; क्रोधाच्या समयीं (याकोबाची) पूर्णता आठींव; क्रोधाच्या समयीं दया आठींव. हे परमेश्वरा, तारण कर; आह्मी हांक मारितों, त्यादिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें. कांतर तो आमची रचना जाणतो; आह्मी मातीचे आहों, ही आठवण तो करितो. हे आमच्या तारणाच्या

देवा, आपल्या नामाच्या गौरवासाठीं आह्मास साह्य कर; आणि, आपल्या नामासाठीं आमच्या पापांची क्षमा करून आह्मांस सोडीव.

שומר ישראל हे इस्राएलाच्या रक्षका, इस्राएलाच्या शेषास सांभाळ; आणि प्रत्येक दिवशीं. שמע ישראל बोलणारे असे जे इस्राएल, त्यांचा नाश न होवो.

हे एकच जें राष्ट्र, त्याच्या रक्षका, एकच जें राष्ट्र त्याच्या शेषास सांभाळ; आणि प्रत्येक दिवशीं "हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, आणि परमेश्वर एकच आहे" असें ह्मणणारें जें एकच राष्ट्र, त्याचा नाश न होवो.

हे पवित्र राष्ट्राच्या रक्षका, पवित्र राष्ट्राच्या शेषास सांभाळ; आणि प्रत्येक दिवशीं "पवित्र, पवित्र, पवित्र (सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे)", असें ह्मणणाऱ्या पवित्र राष्ट्राचा नाश न होवो.

हे मोठ्या राष्ट्राच्या रक्षका, मोठ्या राष्ट्राच्या शेषास सांभाळ; आणि प्रत्येक दिवशीं אמן יהא שמיה רבא " तथास्तु, त्याचे मोठें नाम (सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त) असो, असें ह्मणणाऱ्या मोठ्या राष्ट्राचा नाश न होवो.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणे उत्पन्न केली आहे, तीजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचे तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणे लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षा पवित्र

जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुह्मीहि तथास्तु असें ह्मणा.

תענו ותעתרו आकाशांतून (दयेने) तुह्मास उत्तर मिळो व तुमचें ऐकलें जावो, तुमचें ओरडणे मान्य होवो, तुमची प्रार्थना प्रसन्नतेने ऐकली जावो, आणि तुमच्या विनंतीचे वाणीचें उत्तर हि मिळो; आणि शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, "तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुह्मी जितके आहां त्यापेक्षां हजारपट अधिक करावें; आणि जसें त्याने तुह्मास वचन दिल्हें आहे, तसा तुह्मास आशीर्वादहि द्यावा," हे तुह्मामध्यें स्थापित होवो; (पश्चात्तापाच्या दाहादिवसांत हाझान ह्मणेल, आणि तुह्मास; मंडळीने ह्मणावे, आणि आह्मास, तो चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो.) आणि असी (त्याची) प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु ह्मणू.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्याची प्रार्थना व काकळूत, आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהא שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, अरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच (आकाशांत) शांति राखितो, तो तुह्मास व सर्व इस्राएलासहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

गीत १३०

שִׁיר הַמַּעֲלוֹת "हे परमेश्वरा, मी खोलस्थानांतून तुला हांक मारीत आहें. हे प्रभु, तूं माझा शब्द ऐक; माझ्या काकुळतीच्या शब्दाकडे तुझे कान तत्पर व्हावे. हे परमेश्वरा, हे प्रभु, जर तूं अन्यायांची झडती घेतोस; तर कोण उभा राहील? परंतु तुजपासीं क्षमा आहे; असें कीं तुझें भय धरलें जावें. मी परमेश्वराची वाट पाहत आहें; माझा जीव वाट पाहत आहे; आणि मी त्याचे वचनाची आशा धरुन राहिलों आहें. जे सकाळची वाट पाहतात, जे सकाळचीच वाट पाहतात, त्यांपेक्षां माझा जीव प्रभुची वाट पाहतो. हे इस्राएला, तूं परमेश्वराची आशा धर; कारण कीं परमेश्वराला दया; आणि त्याच्या जवळ पूर्ण तारण आहे. तोच इस्राएलाला त्याच्या सर्व अन्यायांतून खंडून घेईल."

יִתְגַּדַּל וְיִתְקַדַּשׁ पृ४. ५५

יְהֵא שְׁלָמָא आणि आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जिवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, अरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עֹשֶׂה שָׁלוֹם जो आपल्या उंच (आकाशांत) शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

आदितवारचे पाहांटची विनंती.

בְּמוֹצָאֵי מְנוּחָה शाब्बाथाचा विसांवा जातांना (संपतांना), तुझ्या जेष्ट पुत्राच्या घरांत स्तुति उगीव; तूं

आपला आशीर्वाद त्यावर असं दे, लावलेलें झाड कोंबूं देऊं नको; परंतु त्यास फलें येऊं दे, आणि हे परमेश्वरा, जें कांहीं तो करितो तें तूं सफळ होऊं दे.

शाब्बाथाचा विसांवा संपतांना, आह्मी तुझ्या हाताच्या छायेखालीं निवारा घेतों; काम करायाच्या साहा दिवसांत तूं आमचे कामास आशीर्वाद दे; आदितवारीं तूं आह्मास आश्रय हो, सोमवारीं तूं आमचीं उल्लंघनें झांकून टाक, आणि मंगळवारीं आमचे सहाय करायासाठीं (आह्मांकडे) पाहा.

शाब्बाथाचा विसांवा संपतांना, तुझें तारण पाठीव; बुधवारीं कोमलेल्यांस ताजे कर; बृहस्पतवारीं माझीं ओंगळ पापें क्षमा कर; शुक्रवारीं जें आह्मीं करूं, तें सफल होवो, आणि शनवारीं तूं आमचा उद्धार कर.

बत אהובת בת देवाची प्रियकर कन्या * पाहांटेस उठली आहे; (हे देवा), तिचीं लाल झालेलीं पापें सरळपणा सारिखीं व निष्कपटते सारिखीं तूं शुभ्र कर.

שיר לך מהללת ती मुख्य वाजंत्र्याला आयेलेथ शाहरावर (दावीदाने केलेलें) गीत गाऊन तुझी स्तुति करीत आहे.

נדדה שנת עינה ती आपल्या डोळ्यावरील गाढ झोंप उडवून, आपल्या काळे झालेल्या अपराधांची क्षमा मागायास (आली आहे;) ती आपल्या पापाविषयीं ओरडत आणि अश्रुपाताने काकळूत करीत आहे. שיר לך

יושבת ברוב פחדה तिने पाप केलें आहे, ह्मणून ती भयाभीत होऊन बसली आहे; तिने थरथरण्याचा झगा पांघरिला आहे. आणि ती तुजकडे ओरडून पश्चात्ताप क-

*इस्राएल

रीत आहे; निश्चयें तिला तिच्या फिरण्यापासून (भ्रष्ट होण्यापासून) निरोगी कर. שיר לך

מדי עלותה जेव्हां ती देवालयांत प्रार्थना करायास येते, तेव्हां हे इस्राएलाच्या बळदात्या व उद्धारका, तिला क्षमा कर; व तिचीं पापें माफ कर; आणि तिजकरितां तिच्या पूर्वजांच्या कराराची आठवण कर. שיר לך

נורא אתה तूं भयंकर आहेस, तूं तिच्या विनंतीकडे कान लाव; हे देवा, तिच्या दुःखाच्यासमयीं तूं तिचा वाद कर; आतां तुझ्या दरिद्री लोकांचें तूं शांत्वन कर; आणि प्रसन्न तेने सियोनेचें कल्याण कर. שיר לך

חון תחון तुजकडे परतणाऱ्या तुझ्या पुत्रांवर तूं दया करच कर, ते भयाने तुजपुढें उभे आहेत; ज्यावेळीं ते न्यायात बोलविले (उभे केले जातील, त्याविषयीं) त्यांस भय वाटतें कारण त्यामुळें (त्यांवर) दुःखे आलीं आहेत. שיר לך

זכור תזכור तुला भिणाऱ्यांसाठीं व तुझ्या नामाविषयीं विचार करणाऱ्यासाठीं न्यायाच्या दिवसीं तूं दया आठीव, आणि निवाडा करण्याच्यासमयीं आपला राग व क्रोध मोड (सोड); तेहि (एकवेळ) न्यायांत बसणारे (न्याय करणारे) होते. שיר לך

קרב לי हे देव माझ्या मुक्तीचें वर्ष जवळ आणून मला खंडून घे, स्थीर पाण्यावर मला ने; आणि मजकरितां सरळ पुरुषाच्या (याकोबाच्या) पुण्याची आठवण करून, मला तुझ्या मनावर मोहरीप्रमाणे करून ठेव. שיר לך

אם עונות תשמור जर तूं माझ्या अपराधांची झडती घेतोस, तर ते मजवर (ओझ्याप्रमाणे) भारी आहेत; हे माझ्या खडकरूप आश्रया व माझ्या खंडून घेणाऱ्या, पाहा,

मी तीं कसीं वाहूं शकेन ! मी त्यांचा (दंड) सोसूं शकणार नाहीं; हे देवा, निश्चयें, माझी कुकर्में मला क्षमा कर. שיר לד

מבית מלוני मी आपल्या राहाण्याच्या घराहून आपल्या खेदांत असतां, उठून नेमाप्रमाणे आपल्या प्रभूच्या घरीं आलों आहें; आणि ओरडतांना माझे डोळे त्याकडे टांगले (लागले) आहेत.

בקראי ענני हे माझ्या यथार्थतेच्या देवा, जेव्हां मी हाक मारितों; तेव्हां मला उत्तर दे.

שרירות יצרי माझ्या कुकल्पनेच्या हट्टाने मला नीचावले, माझ्या दुराचाराने मला घाबरविलें, आणि फितुर होण्याच्या पापाने मला (आपल्या मार्गांत) चालविलें आहे; मी थुंका (आँवडा) गिळूं लागलों, तरीं तें मला सोडीत नाहीं בקראי ענני

הבאיש ריחי तें मजवर अधिकार करितें; ह्मणून माझा श्वास घाणेर्डा येऊं लागला आहे; त्यानी माझ्या जीवास कडवट (दुःसह) करुन, तें मजवर प्रबळहि झालें आहे; माझी शक्ति क्षीण करुन, मला पिडिलें; त्याने (माझी) सुखाची रात्र व्याकुळपणा असी केली आहे, בקראי ענני

הקץ משנת भविष्यवाद्याने (कथलेल्या) दुःखाच्या निद्रेपासून धिःकारलेल्या लोकांस जागे कर (सोडीव); आणि त्यांच्या मुक्तिची वर्षें जवळ आण; आणि दुःखिताच्या व दुर्बळांच्या ओरडण्यास प्रसन्न हो, कारण तूंच माझी वाटी (वेतन) व माझा भाग यांचें भरण आहेस. בקראי ענני

תם ונשלם שבח לאל בורא עולם
पृथ्वी उत्पन्न कऱ्यां देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.